₹ 25.00 ISBN 978-81-237-1470-7

नैशनल बुक ट्रस्ट, इंडिया

जवाहरलालांच्या आठवणी

देस राज गोयल

अनुवाद

नीला शर्मा

ISBN 978-81-237-1470-7

प्रथम प्रकाशन : 1995 (*शके* 1917)
पहिली आवृत्ती : 2006 (*शके* 1927)
दुसरी आवृत्ती : 2013 (*शके* 1934)

मूळ © देसराज गोयल, 1989
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1995

Yaad Jawaharlal Ki *(Marathi)*

₹ 25.00

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नेहरू भवन, 5 इन्स्टिट्यूशनल एरिया, फेज-II
वसंत कुंज, नवी दिल्ली-110 070 यांनी प्रकाशित केले.

नवसाक्षर साहित्यमाला

जवाहरलालांच्या आठवणी

देस राज गोयल

अनुवाद

नीला शर्मा

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

अनुक्रमणिका

1.	जवाहरलालांच्या आठवणी	3
2.	नेता आणि जनता : आदर्श नाते	7
3.	मातापित्यांचा लाडका	12
4.	आदर्श जोडपे	18
5.	गांधीजींची जादू	23
6.	शेतकरी शक्ती	30
7.	तुरूंगवास	35
8.	पिता-पुत्र संबंध	42
9.	रशिया यात्रा	48
10.	गंगामाता	53
11.	चाचा नेहरू	59

1

जवाहरलालांच्या आठवणी

संत कबीराने सांगून ठेवलं आहे:

कबीरा तुम पैदा हुए, जग हंसा तुम रोए।
ऐसी करनी कर चलो, तुम हंसो जग रोए ॥

हा दोहा यशस्वी जीवनाचे सूत्र सांगणारा आहे. लोक ह्या जगात येतात. खातात-पितात आणि निघून जातात. अशा जीवनाला यशस्वी जीवन म्हणता येणार नाही. किडेमुंग्याही असं जीवन जगतात. माणसाच्या आयुष्याचं आगळंवेगळं वैशिष्ट्य म्हणजे एकमेकांच्या उपयोगी पडणं. अनेकांच्या उपयोगी पडणारा माणूस आपण गमावला की सर्वांना अतीव दुःख होणं हे स्वाभाविकच आहे. असा माणूस आपल्यातून गेला की आपण रडतो, त्याच्या गुणांना आठवतो.

जवाहरलाल नेहरूंचं आयुष्य असंच काहीसं होतं, त्यांनी स्वतःला भारताशी एकरूप करून घेतलं होतं. भारताची मानव समाजाशी सांगड घातली. त्यांच्या आणि त्यांच्या उद्गारांच्या आठवणी सतत मनात जागत्या ठेवण्यातून आयुष्य यशस्वी करायला प्रेरणा मिळते.

जवाहरलाल नेहरू भारताचे पहिले पंतप्रधान होते, स्वतंत्र भारताचे, लोकशाही भारताचे. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात त्यांचा पुढाकार होता. त्यांना भारतात लोकांचं शासन हवं होतं. म्हणजे लोकशाही किंवा लोकतंत्र. म्हणूनच भारतीय त्यांना आधुनिक भारताचा निर्माता मानतात.

केवळ भारतीयच नव्हे तर सारं विश्व तसंच मानतं.

जवाहरलाल नेहरू एक प्रकारे भारताचं प्रतीकच ठरतात. जसं गंगा, हिमालय, गांधी ह्यांपैकी कुणाचंही नाव घेतलं की भारतच नजरेसमोर येतो, त्याचप्रमाणे जवाहरलाल नेहरूंचं नाव घेतल्यावरही आपल्याला भारतच आठवतो. नेहरूंबद्दल सांगणं म्हणजे आधुनिक भारताबद्दल सांगणं, आणि आधुनिक भारताबद्दल काही सांगणं म्हणजे नेहरूबद्दल सांगणं आहे.

जवाहरलाल नेहरू आणि आधुनिक भारत हे एकमेकांत पूर्णपणे मिसळलेले आहेत. ह्या दोहोंनाही एकमेकांपासून सुटं करून विचारच करता येत नाही. जवाहरलालांचं गुणवर्णन करणारा माणूस निश्चितच भारतीय नीतीबद्दलही कौतुकाने बोलताना आढळतो. भारतीय नीती ज्याला रूचत नाही तो जवाहरलालांची निंदा करतो. "आम्ही नेहरूंच्या देशातले रहिवासी आहोत," असं कुणीही म्हणालं की हा भारतीय आहे हे क्षणात समजतं.

हे कसं काय? याचं कारण म्हणजे जवाहरलाल आणि भारतीयांनी एकमेकांवर अतोनात प्रेम केलं. जवाहरलालांना भारत आणि भारतीय खूपच आवडत असत. त्यांची मनापासून ते सेवाही करीत असत. त्यांना स्वतःच्या कुटुंबाबद्दल जे प्रेम, जी ओढ होती त्याचे रूपांतर हळूहळू देशवासीयांबद्दलच्या प्रेमात झाले. त्यांना अखिल मानव जातीबद्दल जे प्रेम होते त्याचाच एक भाग म्हणजे त्यांना वाटणारे देशप्रेम. त्यांना भारताची जडणघडण विकासाच्या दृष्टीने करून घ्यायची होती. त्यामुळे साऱ्या विश्वाचाच विकास होणे त्यांना अपेक्षित होते.

भारतीयांबरोबर त्यांचे नाते कोणत्या प्रकारचे होते? जवाहरलालांनी आपल्या भाषणात अनेकदा ह्याविषयी सांगितले आहे. एका भाषणात ते म्हणाले होते, "जनतेकडून मला अपार प्रेम मिळाले आहे. तुम्हीच मला पंतप्रधान केलंय्. ही फार मोठी जबाबदारी आहे. मोठा सन्मान आहे. भारतासारख्या विशाल देशाचा पंतप्रधान होणं ही जबाबदारी साधी नव्हे. मात्र ज्या प्रकारचं प्रेम आणि आदर लोकांनी मला देऊ केलं आहे तसं क्वचितच अन्य कोणा पंतप्रधानाच्या वाट्याला आलं असेल. त्यासाठी मी आपला हार्दिक आभारी आहे. भारताच्या लाखो लोकांच्या हृदयात मला

ते देशाशी एकरूप झाले होते

स्थान मिळालं आहे. ह्याबद्दल मी नेहमी विचार करीत असतो. माझ्या आयुष्यातली संध्याकाळ जरी समोर येऊन ठेपली असली तरी माझ्यातली उर्मी अजूनही जिवंत आहे. माझं शरीर भस्मसात होईपर्यंत मी प्राणपणाने देशाची सेवा करीत राहणार आहे. केवढं प्रेम दिलंय् मला लोकांनी? केवढा विश्वास दिलाय!"

देश, प्रेम आणि विश्वासाचा हा परस्परसंबंध नेहरूंनी नेहमी कायम ठेवला होता. शरीर संपल्यावरही त्यांनी मोक्षाची आशा धरली नाही. स्वर्गात जागा मिळविण्यासाठी पूजा, देवधर्माचा आधार घेतला नाही. माझ्या चितेची थोडीशी राख गंगेत अर्पण करा, एवढंच फक्त ते म्हणाले. उरलेली सगळी राख विमानातून देशभरातील सर्व शेतांमध्ये विखरून टाकण्यात आली.

गंगेत राख सोडायला सांगितली ती काही मोक्षाच्या आशेने नव्हे! तर गंगा-यमुना ह्या दोन्ही नद्या त्यांना मातेसमान वाटायच्या. अलाहाबादला त्यांचा जन्म झाला, तेथेच ते लहानाचे मोठे झाले. ह्या नद्यांचं असंख्य वेळा

दर्शन घेतलं, त्यांच्यात स्नान केलं, त्यांच्याबद्दलच्या कथा ऐकल्या. त्यांचे चढ-उतार त्यांना आईचे हसणे व संताप ह्यासारखे वाटत असत. मग आपल्या चितेची राख गंगेत अर्पण होणं म्हणजे आईच्या कुशीत कायमचं विसावण्यासारखं वाटलं त्यांना.

भारताचे शेतकरी काम करीत, धान्य पिकवीत त्या शेतांमध्ये ही राख विखुरण्यात आली. भारतीयांबद्दलच्या ज्या प्रेमाचा उल्लेख जवाहरलाल वारंवार करतात ते ह्या शेतकऱ्यांसंदर्भात त्यांच्या मनात खूप मोठ्या प्रमाणात होते. ह्या शेतकऱ्यांशी त्यांचे संबंध कशामुळे निर्माण झाले ते आपण पुढे बघणारच आहोत. त्यांची सेवा ते कशा प्रकारे करू इच्छित होते तेही बघू. ह्या ठिकाणी सांगायचा मुद्दा म्हणजे मृत्यूनंतरही त्यांची ह्या शेतकऱ्यांमध्येच राहायची इच्छा होती. ह्या देशाच्या मातीत मिसळूनच ते राहू इच्छित होते.

अशा महान नेत्याचा विसर आपल्याला कसा बरं पडेल ? ज्यांना त्यांची आठवण राहणार नाही ते दुर्दैवीच म्हणायचे. ज्या नेत्याला आपल्या देशातील जनतेबद्दल इतक्या प्रचंड प्रमाणात वाटत असते त्याचा प्रभाव त्या देशाच्या जीवनावरही निश्चितच खोलवर पडतो. भारतीय संस्कृतीचा कोणताही पैलू नेहरूंनी आत्मसात करायचा सोडला नाही. म्हणून त्यांचा विसर पडणं म्हणजे जणू स्वतःचाच विसर पडण्यासारखं आहे. त्यांची आठवण मनात ठेवणं आणि ती सतत जागवणं म्हणजेच स्वतःला परखून घेत रहाणं आहे.

त्यांच्या आयुष्यातले काही महत्त्वाचे पैलू आपण बघूया. त्यांनी सांगितलेले विचार समजून घेण्याचा प्रयत्न करूया. असं करणं म्हणजे त्या नेत्याला आदरांजली वाहणं, एवढंच फक्त नाही तर आपल्या देशाचा पाया ओळखणं, आपल्या संस्कृतीची माहिती करून घेणं, तिचे रंगरूप जाणून घेणं.

2

नेता आणि जनता : आदर्श नाते

जवाहरलालांचे नाते जनतेशी कसे होते ते आपण त्यांच्याच शब्दांत पाहिले. हा नेता आणि जनता ह्यांच्यात परस्पर विश्वास आणि प्रेम कशा प्रकारचे होते ? त्यांच्या आयुष्यातल्या कितीतरी घटनांमधून आपल्याला हे समजून घेता येईल. त्यांपैकी काही आपण बघूया.

जनतेला फसवणं त्यांना अजिबात आवडत नसे. एकदा दिल्ली प्रदेश काँग्रेस समितीने एक सार्वजनिक सभा आयोजित केली. पंडितजींना त्या सभेत भाषण करायचं होतं. संध्याकाळी सहा वाजता ही त्यांच्या आगमनाची वेळ ठरली होती. शहरभर मात्र दवंडी पिटून, "पंडितजींचं संध्याकाळी पाच वाजता भाषण आहे," असंच सांगितलं जात होतं. त्यांच्याही कानावर ते पडलं. बरोब्बर पाच वाजता ते सभेच्या ठिकाणी येऊन पोहोचले. तिथं काम करणाऱ्यांची अगदी त्रेधा उडाली.

अध्यक्षांनी सांगितलं, "पंडितजी, आपण सहा वाजता यायला हवं होतं. अजून तर सगळे लोक जमायचे आहेत."

जवाहरलाल म्हणाले, "दवंडीत तर पाच वाजताची वेळ सांगितली जाते आहे."

अध्यक्ष म्हणाले, "लोकांना पाच सांगितलं की ते सहा वाजेपर्यंत पोहोचतात."

नेहरू ह्या प्रसंगामुळे खूप नाराज़ झाले. म्हणाले, "लोकांशी अशा तऱ्हेची लबाडी करणं मला बिलकुल आवडत नाही. आणि आपण नेहमी असेच

करीत राहिलो तर लोकांना तरी वेळेवर यायची सवय कशी लागणार ?"

जनतेच्या वेळेची आणि जनतेची गैरसोय होऊ नये ह्याची ते केवढी काळजी घेत असत? केरळमधली एक घटनाही हेच सांगते. एकदा निवडणुकीच्या दौऱ्यासाठी जवाहरलाल केरळला गेले होते. एर्नाकुलमहून तिरूवंतपूरला ते मोटारीने निघाले होते. वाटेत उशीर झाला. सभेच्या मैदानात जनतेचा प्रचंड समुदाय त्यांची वाट बघत होता.

धुळीने माखलेल्या अवस्थेत ते तेथे पोहोचले. दिवसभराचा प्रवास आणि लागोपाठच्या भाषणांमुळे दमणूकही झाली असणार. स्वच्छ आंघोळ करावी आणि भोजन करून नंतरच सभेसाठी उपस्थित व्हावं असं काही जणांनी त्यांना सुचवून पाहिलं. जवाहरलालांनी तत्काळ उत्तर दिलं, "माझ्या दमणुकीचं सोडा हो, ती संपेल. पण जी माणसं इथं नुसतं माझं भाषण ऐकण्यासाठी तासंतास उभी आहेत, त्यांचं काय ?"

एवढं बोलून ते मैदानातच तडक जाऊन पोहोचले. झालेल्या उशिराबद्दल क्षमा मागितली. भाषण केलं. त्यानंतरच मग त्यांनी जाऊन आंघोळ केली, जेवले आणि विश्रांती घेतली.

असाच दुसरा प्रसंग 1938 साली, जवाहरलाल नेहरू काँग्रेस अध्यक्ष असतानाचा आहे. आमच्या एका मित्राने आम्हाला तो सांगितला.

मद्रास नगर पालिकेकडून त्यांचा सत्कार केला जाणार होता. मद्रास रेल्वे स्थानकावर नेहरूंना बघण्यासाठी तोबा गर्दी झाली होती. आमचे मित्रही तेथे पोहोचले. त्यावेळी त्यांचे वय चौदा-पंधरा वर्षाचे असावे. बांधाही लहानखुरा होता. गाडी पोहोचल्याबरोबर प्रचंड धक्काबुक्की झाली. मित्रवर्य गर्दीच्या लोंढ्याबरोबर स्टेशनातून बाहेरच्या सडकेपर्यंत पोहोचले. साहजिकच ते खूपच निराश झाले होते. नेत्याला बघण्याची प्रबळ इच्छा तर होती. पण ती पूर्ण कशी होणार ?

एवढ्यातच सगळी गर्दी एकदम बाहेर उसळून आली. मधोमध एक उघडी जीप होती, तिच्यात जवाहरलाल बसले होते. गर्दीमुळे गाडी पुढे सरकेना. रस्ताही नजरेस पडेना. पोलिसांनी वाट काढण्यासाठी काठीचा उपयोग सुरू केला.



अलोट गर्दीत जवाहरलाल

ते पहाताच जवाहरलाल गाडीतून उतरले. पोलिसांच्या काठी चालविण्याला त्यांनी विरोध केला. पुढे होऊन आवाज चढवीत ते म्हणाले, "तुम्ही जर वाट दिली नाही तर तुमच्या शहरात मी येऊ कसा शकणार ? तुमच्या शहरात मी आलेलं तुम्हाला आवडलेलं नाहीये का ?"

ह्या शब्दांनी मात्र जादू केली. गर्दी मागे सरली. जवाहरलालांच्या मोटारीसाठी वाट करून देण्यात आली. आमच्या मित्राचा फायदा झाला. गर्दी संपल्याक्षणी हे मित्रमहोदय पहिल्या रांगेतच सामोरे आले. नेत्याला बघायची इच्छा पूर्ण झाली. एवढ्यासाठी त्या प्रसंगाचा आमच्या मित्रवर्यांना कधी विसर पडला नाही. जवाहरलालांची किमया ते मान्य करतात.

जनतेवर जवाहरलालांचा जो जादुई प्रभाव पडायचा त्यालाही कारण आहे. त्यांचा जनतेवर भरपूर विश्वास होता. जनतेशी ते लबाडी करीत नसत. विनाकारण कुठलीही झळ पोहोचू देत नसत.

पंतप्रधानांच्या सुरक्षेसाठी तैनात केलेल्या पोलिस अधिकाऱ्यांना त्यांचं

नेहमी सांगणं असे, “जर जनतेलाच मला सुरक्षित राहू द्यायचं नसेल तर तुम्हीही माझ्या सुरक्षिततेसाठी असमर्थ ठराल.” ते जनतेच्या आणि त्यांच्या दरम्यान कधीही पोलिसांची लुडबूड खपवून घेत नसत.

तिसरी घटना सन 1954ची आहे. अमेरिकेचे राष्ट्रपती भारतात आले होते. आयसेन हॉवर त्यांचं नाव. भारतीय परंपरेनुसार त्यांचं भरघोस स्वागत झालं. विमानतळापासून राष्ट्रपतीभवनापर्यंत त्यांना उघड्या मोटारीतून आणलं गेलं. ते केवळ राष्ट्रपती किंवा पंतप्रधानाचे पाहुणे नव्हते तर भारत देशाचे पाहुणे होते. म्हणून अधिकाधिक लोकांना त्यांना बघता यावे व त्यांनीही भारतवासीयांना मोठ्या प्रमाणात बघावे अशीच जवाहरलालांची इच्छा होती. अशा साध्या सहज भेटींमुळे माहिती तर मिळतेच पण परस्पर सामंजस्यही वाढते.

आयसेनहॉवरबरोबर उघड्या मोटारीत जवाहरलालही होते. सोबत कित्येक मोटारींचा ताफाही होता. त्यांच्यात अधिकारी वर्ग आणि अतिथी महोदयांच्या सोबत आलेली मंडळी बसली होती. रस्त्यावर ह्या दोन नेत्यांना बघण्यासाठी खूपच गर्दी जमली होती. कनाट प्लेस ह्या ठिकाणी तर ही गर्दी आणखीही जास्त होती. नेत्यांची मिरवणूक तेथे पोहोचल्याक्षणी गर्दीत घेरली गेली पुढे सरकायला वाटच मिळेना. पोलिसांनी लगेच धक्के आणि काठयांचं तंत्र सुरू केलं.

जवाहरलालांना काही ते आवडलं नाही. लोकांनी रांगा मोडून रस्त्यावर येणं त्यांना अजिबात रूचलं नाही. एकाएकी उडी मारून ते मोटारीच्या इंजिनावर पोहोचले. पोलिसांना लाठ्याकाठ्या चालविण्यास त्यांनी मनाई केली. लोकांना मागे सरायला सांगितलं. ह्यात उशीर होताना दिसल्यावर ते गाडीतून उडी मारून स्वत: रस्त्यावर आले. स्वत:च लोकांना बाजूला सारू लागले. त्यांना रस्त्यावर बघताक्षणी लोक भराभर मागे सरू लागले. रस्ता मोकळा झाला. जवाहरलाल पुन्हा गाडीत आपल्या जागी जाऊन बसले. मोटारींची मिरवणूक पुढे निघाली.

पोलिस आश्चर्यचकित झाले. अधिकाऱ्यांना चिंता वाटली. अमेरिकेहून आलेल्या पाहुण्यांना तर ही सगळी घटनाच आगळीवेगळी वाटली. पंतप्रधान

आपल्या सुरक्षेची पर्वा न करता गर्दीत शिरतात काय अन् पोलिसांच्या लाठ्याकाठ्यांना न जुमानणारी गर्दी जवाहरलालांच्या दरडावण्याने पांगून वाट मोकळी करून देते काय, सारेच अजब. हा चमत्कार फक्त जवाहरलालजीच करू जाणोत. जनतेशी असलेलं त्यांचं नातं भितीचं नव्हे तर स्नेह प्रेमाचं होतं. असं नातं ज्यात एकमेकांना काय सांगायचंय् ते शब्दही न उच्चारता परस्परांना नेमकं कळतं.

अशी काळजी घ्यायचे जवाहरलाल नेहरू आपल्या देशवासीयांची. असा नेता विरळाच.

3

मातापित्यांचा लाडका

जवाहरलालांचा जन्म 14 नोव्हेंबर 1889 रोजी झाला. त्यांचे वडील मोतीलाल नेहरू अलाहाबादचे नामांकित वकील होते. जवाहरलालांच्या जन्माच्या तीनच वर्षांपूर्वी ते कानपूरहून तेथे आले होते. अलाहाबादला आल्याआल्याच त्यांचा वकिलीत जम बसला. त्या काळातल्या जमीनदार, सावकार, राजा आणि संस्थानिकांमध्ये कोर्टकज्जे फार चालत. मोतीलालजी जबर वकील होते. आपला खटला त्यांनीच चालवावा म्हणून पक्षकारांमध्ये चढाओढ असायची. फी रग्गड मिळायची. जवाहरलाल ज्या घरात जन्माला आले त्या घरात संपत्तीचा जणू वर्षावच होत असे.

पिता मोतीलालांचे घर धनाने, संपत्तीने भरलेलेच असायचे. ती सारी संपत्ती त्यांनी स्वतः कमावलेली होती. त्यांचे वाडवडील मोगल दरबारात वरच्या पदांवर होते. दिल्लीत त्यांचा जमीन-जुमला होता. पण 1857-58 मध्ये ते सगळं नामशेष झालं होतं. इंग्रजी सैन्यातल्या भारतीय शिपायांनी इंग्रजांना हुसकून बहादुर शाह जफरला दिल्लीच्या सिंहासनावर बसविले होते. पण इंग्रजांनी पुन्हा एकदा दिल्ली काबीज केली होती. त्यावेळी किती तरी कुटुंबं लुटली गेलीत आणि दिल्ली सोडून कुठंकुठं निघून गेलीत. मोतीलालांचे वडील गंगाधर नेहरूंचं कुटुंबही अशा कुटुंबांपैकीच एक. हे कुटुंब दिल्ली सोडल्यावर आगरा येथे स्थायिक झालं.

मोतीलालांचा जन्म आगरा येथेच झाला. त्यांच्या जन्माच्या तीन महिन्यांपूर्वीच त्यांचे पिता गंगाधर नेहरूंचं निधन झालं. मोतीलालांच्या बंधूंनी त्यांचं उत्तम शिक्षण करवून घेतलं. कुशाग्र बुध्दीच्या मोतीलालांनी ढीगभर पदव्या पदरात पाडल्या नाहीत पण वकिलीचा जम मात्र चांगला बसवला. आधी कानपूर आणि नंतर अलाहाबाद येथे.

मोतीलालजी केवळ साठवून ठेवण्यासाठी धन कमावीत नव्हते. उत्तम दर्जाच्या घरात राहणं, उत्तम प्रकारचं अन्नपाणी, उत्तम वस्त्रं, अशा सगळ्या दर्जेदार राहणीमानासाठी ते कमावीत होते. ते स्वतःला कुणापेक्षाही कमी समजत नव्हते. त्यांचं राहणीमान कुणापेक्षा कमी प्रतीचं ठरावं, हे त्यांना मान्य होणारं नव्हतं. शहराच्या ज्या भागात मोठमोठे सरकारी अधिकारी राहात असत त्याच भागात त्यांनी बंगला खरेदी केला. त्यांच्याशी बरोबरी करू शकणारे भारतीय श्रीमंतही त्याच भागात राहणारे होते. बंगल्याचं नाव त्यांनी 'आनंद भवन' ठेवलं. ह्यावरूनही लक्षात येतंच की स्वतःच्या घरात सुख,



मोतीलाल नेहरू कुटुंबीयांसमवेत

आनंद मिळवून देणाऱ्या सुखसोयींची त्यांना जुळवाजुळव करायची होती. एवढ्यासाठी ते मेहनत करून कमावीत होते.

जवाहरलाल ही त्यांची तृतीय संतती. त्यांच्याआधी त्यांना दोन मुलगे झाले होते, पण ते जगले नाहीत. तेव्हा असा मुलगा वडिलांचा किती लाडका असेल, त्याची आपण कल्पना करू शकतो. पण मुलगा अतिलाडाने बिघडू नये याचीही ते काळजी घेत होते. मुलाला चांगल्यात चांगले खायला-प्यायला होते, चांगली वस्त्रे होती. वाचायला उत्तम पुस्तकं होती. सेवेत नोकर-चाकर, वाहन म्हणून घोडा गाडी असं सारं काही होतं. पण चूक झाल्यावर शिक्षाही चुकायची नाही.

जवाहरलालांचं वय पाच वर्षांचं असतानाची गोष्ट. एके दिवशी ते वडिलांच्या खोलीत गेले. त्यांच्या टेबलावर दोन सुंदर पेनं दिसली. बाल जवाहरला त्यांचा मोह पडला. न राहावून त्यांनी तिथलं एक पेन उचललं. मोतीलालांना हे कळल्यावर त्यांनी लाडक्या मुलाला अक्षरशः बदडून काढलं. जवाहरलालांना ह्याचा खूप त्रास झाला पण वडिलांबद्दलचं त्यांचं प्रेम मात्र त्यामुळे यत्किंचितही कमी झालं नाही.

मोतीलालांचा दबदबा मोठा होता. घरात आणि घराबाहेरदेखील. त्यांची बैठक भेटायला येणाऱ्यांनी भरलेली असायची. खटले, राजनीती आणि जगभरच्या इतर अनेक गोष्टी तिथे होत. परंतु तिथे मुलांसाठी काही नसे. लाडका मुलगादेखील तिथे कमी वेळा येऊ शके. बाल जवाहर अधिक वेळ आई जवळच असे.

जवाहरलालांच्या मातेचं नाव स्वरूपराणी. त्या सतत पूजा, पाठ, भजन इत्यादी मध्ये गढलेल्या असायच्या. घरातल्या बायकांचं जणू काही एक वेगळंच जग होतं. त्यात रामायण, महाभारत, पुराणातील गोष्टी होत्या. सण उत्सव होते. धार्मिक विश्वासाचं वातावरण होतं.

हे सारं मोतीलालांचं जे पुरुषवर्गाचं जग होतं त्याहून फारच निराळं होतं. मोतीलाल धर्मविरोधक नव्हते, पण चुकीच्या रुढी, परंपरा, कर्मकांड आणि अंधविश्वास यापासून ते लांबच रहात असत. त्या काळी परदेशी जाणारा प्रत्येक भारतीय परत आल्यावर प्रायश्चित्त घेत असे. मोतीलालांना हे अवडंबर वाटायचं. ते परदेशी गेले, पण परत आल्यावर प्रायश्चित, शुध्दी असलं काही

मोतीलाल नेहरू, स्वरूप राणी आणि बाल जवाहरलाल

त्यांनी केलं नाही. जुनाट विचारांच्या कट्टरपंथी लोकांनी त्यांच्यावर काही प्रमाणात बहिष्कार घातला.

जवाहरलालांवर वडिलांच्या विचारांचा खूप प्रभाव होता. सफावारी रंगीबेरंगी वस्त्रे अंगावर घालणे, त्यांना खूप आवडायचं. घरात पक्वान्नं तयार होताहेत, मुलांना गोडधोड वाटलं जातंय् हेही त्यांना खूप आवडायचं. पण धर्माच्या नावाने चालणारा पोकळ बडिवार आणि कट्टरपणा याबद्दल मात्र त्यांना तिटकारा होता.

श्रीमंतांच्या मुलांचं असतं तसं जवाहरलालांचं प्राथमिक शिक्षणही घरातच झालं. त्यांच्यासाठी घरीच एका इंग्रज शिक्षकाची सोय केली होती. त्यांच्याकडून ते पाश्चिमात्य वाङ्मय, तत्वज्ञान आणि विज्ञान शिकले. घरात सर्व प्रकारची पुस्तकं होती. ती बघायची आणि वाचायची संधी त्यांना सतत मिळत असे. त्यामुळे त्यांची ज्ञानाची भूक वाढली.

मोतीलालांकडे एक कारकून होते, त्यांचं नाव मुबारक अली. ते बदायूं शहराचे रहिवासी होते. 1857 च्या दंगलींमुळे त्यांच्या कुटुंबाची अवस्था विकट झाली होती. जवाहरलाल घरात बरोबरीची मुलंच नसल्यामुळे मुबारक अलींसोबत बराच वेळ घालवीत. मुबारक अलींच्या आईच्या डोळ्यांदेखत वडिलांना इंग्रजांनी फासावर चढवले होते. जवाहरलालला ते भारतीय इतिहासातल्या गोष्टी, प्रसंग सांगत. इंग्रजांच्या जुलुमजबरदस्तीविषयी बोलत. त्यांच्या चांगल्या वागणुकीमुळे असेल किंवा सहानुभूतीपूर्वक वागल्यामुळे असेल, जवाहरलालांना त्यांची सोबत खूप हवीहवीशी वाटायची.

वयाच्या सोळाव्या वर्षीच जवाहरलालांना शिक्षणासाठी परदेशी पाठवण्यात आलं. मोतीलालांनी इंग्लंडच्या प्रसिध्द हॅरो विद्यालयात त्यांचं नाव घातलं. इंग्लंडच्या कितीतरी पंतप्रधानांचं शालेय शिक्षण ह्या ठिकाणी झालं होतं. चांगली शाळा होती ती. जवाहरलाल खूप अभ्यास करायचे. त्यामुळे त्यांचे शिक्षकही खूष होते. पण जवाहरलालांचं मन काही केल्या त्या अभ्यासात रमेना. त्यांचं लक्ष पूर्णपणे आपल्या देशात घडणाऱ्या घटनांकडे लागलं होतं.

त्या काळात 'वंग भंग चळवळ' जोरात होती. इंग्रज साहेब लॉर्ड कर्झननें

बंगाल प्रांताची फाळणी केली होती. भारतीयांचा ह्या गोष्टीला विरोध होता. चळवळ देशभर पसरली. गल्लोगल्ली 'वंदेमातरम्'च्या घोषणा दुमदुमल्या. जवाहरलालांना ह्या सगळ्या घडामोडी आणून द्यायच्या होत्या. ते भारतातून वर्तमानपत्र मागवीत. सगळं काही समजून घेण्याचा प्रयत्न करीत. राजकारणात प्रवेश केला नसला तरी देशभक्तीचा अंकुर मात्र त्यांच्या मनात नुकताच फुटू लागला होता.

हॅरो विद्यालयातले त्यांचे शिक्षण पूर्ण झाले. त्यानंतर केम्ब्रिज विद्यापीठात त्यांनी प्रवेश घेतला. तेथे विज्ञान शाखेतलं शिक्षण त्यांनी घेतलं. त्यानंतर लंडनला जाऊन कायद्याचं शिक्षण घेऊन ते बॅरिस्टर झाले.

जवाहरलालांना परदेशातल्या विद्यालय आणि महाविद्यालयांमधील वातावरण रूचत नव्हते. ते फार वरवरले आहे असे त्यांना वाटे. त्यात सार्थक होणारे काही असे त्यांना सापडेना. खेळांमध्ये आणि खाण्यापिण्यातल्या चैनीतही त्यांनी स्वतःला रमवू पाहिलं. पण त्या कशातही त्यांना आनंद वाटेना.

ह्या काळात त्यांना नवीन प्रकारच्या विचारांचं मात्र पुरेपूर आकर्षण वाटलं. विज्ञानामधल्या नव्या शोधांचं कुतूहल मनात निर्माण झालं. समाजवादी विचारसरणी आवडायला लागली. आशिया खंडातले रहिवासी युरोपपेक्षा जास्त प्रगती करीत असल्याचं उदाहरण समोर आलं की ते खूप आनंदित होत. 1906 झाली जपानने रशियावर विजय मिळविला तेव्हाही त्यांना अभिमान वाटला. मागासलेल्यांनी पुढे यावं अशी अतीव इच्छा त्यांच्या मनात होती.

श्रीमंत बापाचा एकुलता एक पुत्र होते जवाहरलाल. ते वाया गेलेला श्रीमंतही होऊ शकत होते. पण एवढ्या सगळ्या सोयीसुविधा, थाटमाटाची साधनसामग्री हाताशी असूनही केवळ जनसेवेच्या व्रताकडेच त्यांचं मन अधिक झुकलं. आज आपल्याला जवाहरलालांची आठवण बड्या बापाचा वाया गेलेला मुलगा अशा संदर्भात होत नाही. ते परदेशात राहून कसे थाटात वाढले हेही आपण आठवत नाही. वाईट मार्गाला जाण्यासारख्या संधी आणि साधने जवळ असूनही ते वाईट मार्गाला गेले नाही ह्या गुणामुळे ते आपल्या आठवतात. सुखमय आयुष्य सोडून देश आणि देशबांधवांच्या सेवेसाठी त्यांनी संकटे अंगावर घेतली ह्यासाठी त्यांची आठवण आपल्याला होते.

4

आदर्श जोडपे

मोतीलालानी आपल्या मुलाला विचारलं, "तुला सुंदर पत्नी आवडेल की शिकलीसवरलेली ?"

पुत्रानं उत्तर दिलं, "तुम्हाला नाक हवंय की डोळे असं विचारल्यासारखा तुमचा प्रश्न आहे. दोन्ही हवेत."

मुलाचं लग्न व्हावं, सून घरात यावी, अशी इच्छा प्रत्येकच मात्यापित्याची असते. मुलगा जर एकुलता असेल आणि घरात संपत्तीला तोटा नसेल तर ही इच्छा आणखीही तीव्र होते. जवाहरलालांच्या आई-वडिलांचीही तेव्हा अशीच मनस्थिती होती.

पिताजी मोतीलाल आणि माता स्वरूपराणी या दोघानाही सून भारतीयच हवी होती. भारतीय सून आपल्या मुलाला जास्त सुखी करू शकेल असं त्यांना वाटत होतं.

हा विचार जवाहरलालजी परदेशात शिक्षण घेत असताना त्यांना कळविण्यात आला. त्यांनी परदेशात लग्न उरकून घेऊ नये, यासाठी ही काळजी घेण्यात आली.

पण ही काळजी विनाकारणच म्हणायची. कारण त्या वेळी जवाहरलालांना स्वतःच्या लग्नाबद्दल विचारसुध्दा करायचा नव्हता. जगात काय चाललं आहे ते जाणून, शिकून घेण्याची उत्कट इच्छा फक्त त्यावेळी त्यांच्या मनात होती. ते म्हणत असत की मुलं जन्माला घालून त्यांना वाढवणं एवढंच फक्त सफल जीवन ठरावं का ? त्यांना याहून वेगळं, जास्त काहीतरी

कमला आणि जवाहरलाल

करायची इच्छा होती. म्हणून पारंपरिक कौटुंबिक आयुष्याकडे त्यांचा फारसा ओढा नव्हता. त्यांना मानवी जीवन समजून घ्यायचं होतं.

लग्नाला त्यांचा विरोध नव्हता. पण त्यांना समजून घेणारी पत्नी असावी हा मात्र त्यांचा आग्रह होता. तो त्यांना वडिलांजवळ बोलून दाखविला. मोतीलालांच्याही मनात तेच होतं. त्यांनी जवाहरलालांसाठी वधूसंशोधनाची जबाबदारी स्वतःकडे घेतली. दिल्लीतल्या एका काश्मिरी कुटुंबातली होती कमला. ती त्यांना सून म्हणून आवडली. (8 फेब्रुवारी 1916 रोजी वसंतपंचमी ह्या तिथीला लग्न थाटामाटात पार पडलं.

कमला जवाहरलालांपेक्षा दहा वर्षांनी लहान होत्या. त्यांचं शिक्षणही फार झालेलं नव्हतं. पण देशप्रेमाची नितांत ओढ मात्र त्यांच्या मनात होती. जवाहरलालांचं मन त्यांच्यावर खूप असलं तरी पत्नीच्या मनातली ही ओढ मात्र त्यांच्या लक्षात आली नाही. म्हणून सुरुवातीला काही दिवस त्यांचं कौटुंबिक आयुष्य आणि राजकारण दोन्ही वेगवेगळ्या पातळ्यांवर होतं.

त्या काळात जवाहरलाल राजकारणात बुडून असत. कमलासोबत फारसा वेळ घालवू शकत नसत. पण त्यांच्याकडे लक्ष मात्र असे. त्यांच्यामुळे दुबळेपण मात्र जवाहरलालांना आलं नाही. एके ठिकाणी ह्या संदर्भात त्यांनी लिहिलं आहे "मला तिची मदत आणि शक्ती मिळाली नसती तर मी काय करू शकत होतो ? माझ्या मनाला आणि शरीरालाही तिच्याकडून नवीन बळ मिळत असे."

जवाहरलाल आणि कमला यांचं सहजीवन जवळ जवळ वीस वर्षांहून अधिक होतं. ह्या काळातही जास्त वेळ मात्र राजकारणातच दिला जाई. वारंवार तुरुंगात जावं लागे. तरीही पत्नीचा त्यांच्या आयुष्यावर खूप प्रभाव पडला. ह्याची साक्ष देणारे त्यांचे शब्द असे:

"ती भारतीय स्त्रीचं, साऱ्या स्त्रियांचंच प्रतीक ठरली. भारताचा विचार करताना, भारताच्या शक्ती आणि मर्यादा ह्या कशाचाही विचार करीत असताना कमलेचं चरित्रही नकळतपणे त्यात मिसळलेलं असायचं. भारतासारख्याच तिच्याही शक्ती आणि मर्यादा, समजून न येणारी, न सापडणारी ही गुपितं."

जवाहरलालांची जी चित्रं तेव्हा विकली जात असत त्यात एका चित्रात त्यांच्यासोबत कमलाजीही होत्या. त्या चित्रावर शीर्षक होतं — 'आदर्श जोडपं.'

ते दोघेही अगदी सारखे होते किंवा त्यांचे विचार अगदी सारखे होते असं नव्हे. दोघांच्याही विचारांमध्ये आणि काम करण्याच्या पद्धतींमध्ये खूपच फरक होता. त्यांच्यात वादही होत असत. एकमेकांवरची नाराजीही कधीमधी येई. पण ह्या सगळ्याहूनही फार मोठा आदर त्यांना एकमेकांच्या बद्दल सतत वाटत असे. दोघांचीही दृष्टी आयुष्यातील नवीन नवीन रंग शोधून काढणारी होती. नाविन्याची आवड असणारी होती. म्हणूनही त्यांना एकमेकांमध्ये सतत नाविन्य आढळत असे.

कमलाजींच्या मनात लपलेली देशसेवेची आंच जवाहरलालांना 1930-31 मध्ये लक्षात आली. मिठाच्या सत्याग्रहाच्या चळवळीत दोघांनीही एकत्र काम केलं. मोर्च्यांमध्ये एकत्र वणवण केली. हा अनुभव जवाहरलालांना सुखद वाटला.

पण फारच थोडे महिने असं दोघांना एकत्र काम करता आलं. अल्पावधीतच सगळे काँग्रेसी पकडले गेले. नंतर हे काम महिलांनी सांभाळलं. नेहरू कुटुंबातील महिलांचा त्यात पुढाकार होता. मोतीलालांना मात्र हे फारसं रुचलं नाही. स्त्रियांनी हे काम करण्याबद्दल त्यांचे विचार काहीसे जुनाट होते. पण जवाहरलालांना मात्र हे सारं खूप आवडलं.

जवाहरलालांना कमलाजींच्या कामाचा विशेष आनंद झाला. 'शोध भारताचा !' ह्या त्यांच्या पुस्तकात ते म्हणतात:

'ह्या धबडग्यात कमलेने खूपच पराक्रम दाखवला. बघण्याजोगंच काम होतं तिचं. अलाहाबादच्या सगळ्या कार्यकर्त्यांना अटक करण्यात आलं होतं. चळवळीची सारी जबाबदारी कमलेवर येऊन पडली. तिला ह्याबाबतीत तसा काही अनुभवही नव्हता. पण तिने ही उणीव स्वतःच्या मनातली आंच आणि चिकाटी ह्या दोन गोष्टींनी भरून काढली. काही महिन्यांतच अलाहाबादवासीयांना तिचा अभिमान वाटू लागला."

जानेवारी 1931 मध्ये कमलाजी तुरुंगाची वारीही करून आल्या. त्या

तुरुंगात आत असताना एका पत्रकाराने त्यांच्यापाशी जनतेसाठी संदेश मागितला. त्या म्हणाल्या, "माझ्या पतिदेवांच्याच पावलांवर पाऊल टाकून वाटचाल करीत असल्याचा मला खूप आनंद होतो आहे. आपण आपला झेंडा सतत उंच फडकत ठेवू शकू अशी आशा मला वाटते."

तुरुंगातून सुटका झाल्यावर पत्नी आणि मुलगी इंदिरेसह जवाहरलाल श्रीलंकेला गेले. नवरा-बायकोंनी एकत्र घालवलेली ही सुटी पहिली आणि अखेरचीच. जवाहरलालांच्या मनात आलं की ह्या पूर्वीचं आयुष्य हे आताच्या ह्या समजूतदारपणाची मानसिक तयारी करण्यातच जणू व्यतीत झालं.

असे दिवस जास्त संख्येने हाती आले नाहीत. राजकारणाने त्यांना स्वतःत सामावून घेतलं होतं. कमलाजींची प्रकृतीही साथ देईना. त्या आजारी असत. 1926 साली जवाहरलाल त्यांना उपचारासाठी युरोपला प्रथमच घेऊन गेले. परतल्यावर पुन्हा चळवळीमध्ये गुरफटले. कधी तुरुंगात असत, तुरुंगातून बाहेर आले की देशाच्या दौऱ्यावर असत.

कमलाजींना ह्याची खंत नव्हती. त्यांच्यामुळे देशकार्यात बाधा यावी हे त्यांना कसं आवडलं असतं. एकदा अशीही बोलणी कानावर आली की जवाहरलाल जर राजकारणापासून लांब राहाणार असतील तर त्यांना कैदेतून सोडलं जाऊ शकेल. ते तुरुंगाबाहेर येऊन कमलाजींची काळजी घेऊ शकतील. कैद्यांना काही विशिष्ट परिस्थितीत विनाशर्त सोडलं जातं, त्याला 'पॅरोल' म्हणतात. जवाहरलालही असेच पॅरोलवर बाहेर आले होते. कमलाजींनी विचारलं, "हे सगळं काय ऐकायला मिळतंय?" त्यावर जवाहरलालांनी ते असलं काही होऊ देणार नाहीत, असं उत्तर दिलं. ते ऐकून कमलाजींना खूप आनंद झाला.

जवाहरलाल आपल्याजवळ असावेत असं जरी त्यांना खूप वाटत असलं तरी देशसेवा किंवा तत्त्वांना त्यासाठी धाब्यावर बसवणं त्यांना मान्य नव्हतं. त्यांच्या ह्या विचारांचा जवाहरलालांवर खूप परिणाम होत असे. त्यातून त्यांना खूप बळ येत असे.

अशा तऱ्हेने विवाहही जवाहरलालांच्या देशसेवेसाठीच हितकारक ठरला. कमलाजींचा त्याग, धैर्य, पराक्रम, कर्मठपणा ह्या गोष्टी जवाहरलालांना शक्ती देणाऱ्या ठरल्या.

5

गांधीजींची जादू

जवाहरलालांचा उल्लेख करायचा झाला की महात्मा गांधींचं नाव ही हमखास निघतंच. दोघांची नावं जोडूनच घेतली जातात. ह्यापुढे ती अशीच राहातील. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात हे दोघेही महापुरुष सर्वांच्या पुढे जसे होते तसेच अखिल विश्वाला युध्दापासून परावृत्त करण्याच्या आंदोलनातही ते सर्वांच्या पुढेच दिसतात. गांधी-नेहरूंच्या विचारांच्या संगमातून शांतीची वाट आपल्याला सापडू शकते.

जवाहरलालांवर गांधीजींचा खूप प्रभाव होता. गांधीजींमुळे जवाहरलालांना आपलं राजकीय जीवन सार्थक वाटायचं. गांधीजी राजकारणात आल्यामुळे नेहरू भावुक झाले होते. त्यांची भाषा काव्यमय झाली होती. त्यांनी लिहिलं, "ताज्या हवेचा तीव्र झोत यावा तसे ते आले. आम्ही आळस झटकून उठलो आणि दीर्घ श्वास घेतला. ते प्रकाशकिरणासारखे होते. त्यांच्यामुळे आमच्या डोळ्यांतलीही मलीनता स्वच्छ धुतली गेली. सगळं काही उलटं पालटं करून देणाऱ्या वादळासारखे ते होते. लोकांची विचार करण्याची आजवरची जी पध्दत होती ती त्यांनी गदागदा हलवली."

गांधीजींच्या हत्येच्या वेळीही जवाहरलालजींच्या शब्दात असाच भावुकपणा आला होता. आधीच्या शब्दांत उत्साह ओसंडणारा होता तर श्रध्दांजलीच्या वेळी उच्चारलेल्या शब्दांत अपार दुःख होतं, पूज्यतेसाठीचा आदर होता. दुःख होतं ते आता त्यांच्या जवळ सल्ला घ्यायला धावत जावा

येणार नाही म्हणून. पूज्यतेसाठीचा आदर त्यांच्याकडून मिळालेल्या अनंत प्रकाशासाठी होता. हा प्रकाश कधीच संपणारा नव्हता. नभोवाणीवरील आपल्या भाषणात जवाहरलाल म्हणाले

"आमच्यातून तो प्रकाश निघून गेला असं म्हणणं उचित ठरणार नाही. आमच्या देशाला मिळालेला हा प्रकाश सामान्य नव्हता. एवढ्या वर्षांपर्यंत ज्यानं आम्हाला उजेड दिला तो भावी काळातही देत राहील. हजारो वर्षांपर्यंत आमच्या देशाला, विश्वाला हा प्रकाश दिसेल. कितीतरी हृदयांना त्यातून दिलासा मिळेल. हा प्रकाश केवळ आत्तापुरताच नाही, त्याहूनही खूप पुढच्या काळापर्यंत तो असणार आहे. अमर, अनंत असणाऱ्या सत्याचा हा प्रकाश आहे. तो आम्हाला योग्य वाट दाखवील. चुकांपासून परावृत्त करील. ह्या प्राचीन देशाला हा प्रकाश स्वातंत्र्याकडे घेऊन जाणारा आहे."

गांधीजींचा प्रभाव जवाहरलालांवर जादूप्रमाणे झाला होता. त्यांचं कार्य त्याग आणि कर्मठपणा पाहून जवाहरलालजींची राजकारणातली गोडी आणखी वाढली. गांधीजी भेटले नसते तर कदाचित जवाहरलालजींनी राजकारणात एवढ्या प्रमाणात सक्रिय भाग घेतला नसता.

दोघांच्याही वयात वीस वर्षांचं अंतर होतं. गांधीजींचा जन्म 1869 चा तर जवाहरलालाचा 1889 चा. वयातलं हे अंतर परस्पर सहयोगात बाधक ठरलं नाही. जवाहरलालाच्या मनात गांधीजीं विषयी खूप आदर होता. गांधीजींच्या मनात जवाहरलालांविषयी अपार प्रेम होतं.

आदर आणि प्रेमाचा हा संगम गंगा-यमुनेच्या संगमासारखा होता. नद्यांच्या संगमामुळे पाण्याचा प्रवाह आणखी मोठा होतो. खऱ्या आदर आणि खऱ्या प्रेमामुळे विचारांचा प्रवाहही तसाच वाढला. जवाहरलाल आणि गांधीजींनी एकमेकांसोबत काम केलं. पण त्यांनी विचार मात्र आपापल्या स्वतंत्र स्वभावानुसार केला

दोघांच्या विचारात नेहमीच साम्य नसायचं. पण दोघांचाही एकमेकांवर, एकमेकांच्या खरेपणावर पूर्ण विश्वास होता. म्हणूनच ते दोघे एकमेकांपासून कधी वेगळे झाले नाही. मतभेद झाल्यावर ते स्पष्टपणे एकमेकांना सांगून टाकत. चूक बरोबर हा निर्णय कित्येकदा आपापल्या अनुभवावर सोडून देत.

गांधीजींच्या सहवासात काम करण्यासंबंधीचा अनुभव सांगताना जवाहरलालांनी 'आत्मकथा' ह्या आपल्या पुस्तकात लिहिलं आहे, 'गांधीजींना समजून घेणं एकूण कठिणच होतं. आजच्या माणसासाठी त्यांची भाषा खूप जुनी, लांबची वाटणारी होती. पण आम्हाला वाटायचं की ते महापुरुष आहेत ह्याबद्दल काहीच शंका नाही. वेगळाच महापुरुष आणि दिमाखदार नेता. त्यांच्यावर विश्वास ठेवून आम्ही जणू त्यांना कोरा चेक सोपवला होता. कमीत कमी लढा चालू राहील तेवढ्या काळापुरते तरी त्यांच्यापुढे समर्पण केलं होतं."

गांधीजी आणि जवाहरलाल यांच्यातील चर्चा एकदा विकोपाला गेली होती. दोघांत मतभेद होतेच. त्यावर त्यांनी परस्परांना पत्रे लिहिली. त्यासंदर्भात गांधीजींनी 'हरिजन' मध्ये लिहिलं, "मी जवाहरलाल विरुध्द किंवा ते माझ्या विरुध्द उभे ठाकले आहेत याची मला कल्पनाही करवत नाही.

गांधीजी आणि नेहरू

आमचा सामना एका गोष्टीसाठीच होऊ शकतो. भागीदारीतल्या आमच्या आदर्शाच्या प्राप्तीसाठी असणाऱ्या वाटचालीत आमचं एकमेकांवर केवळ प्रेम आहे. आमच्या ध्येय प्राप्तीसाठी कधी आम्ही एकमेकापासून बाजूला गेलो असे जरी कोणाला वाटले तरी ते तात्कालिक आहे. आम्ही पुन्हा एकत्रच असलेले जगाला दिसू. एवढेच नव्हे तर एकमेकाबाबत आणखी जास्त प्रेम आणि आदर मनात घेऊन."

गांधीजींनी जवाहरलाल आपले वारस असल्याचं सांगितलं. त्यांनी स्वतःच ह्याचा अर्थही सांगितला :

"ह्याचा अर्थ म्हणजे मी गेल्यावर ते माझी जागा घेतील. माझी काम करण्याची पध्दत त्यांनी कधीही जशीच्या तशी आचरणात आणली नाही, खुलेपणाने उलट त्यावर टीकाही केली. काँग्रेस पूर्णपणे माझ्या प्रभावात नसतानाही माझा प्रभाव सगळ्यात अधिक त्याच्यावर होता आणि जवाहरलालांनी काँग्रेसची ती नीती पूर्णपणे आचरणात आणली आहे. सरदार वल्लभाई पटेलांसारखी, मी सांगितलेलं सारं कुठलाही किंतू मनात न आणता मान्य करणारी माणसही आहेत, पण ती माझी वारसदार ठरू शकत नाहीत. काम करण्यासाठी जवाहरलालांसारखं बळ आणखी कुणातही नाही हे सर्वजण मान्य करतात. आणि मी हेही सांगतो की जेव्हा मीच नसेन तेव्हा आज माझ्याशी असलेले त्यांचे मतभेदही संपून गेले असतील."

जवाहरलालांनी गांधीजींना प्रथम पाहिलं ते 1915 सालच्या मुंबई येथल्या काँग्रेसच्या अधिवेशनात. त्यानंतरची भेट पुढच्या वर्षी लखनौ काँग्रेसमध्ये झाली. त्या वेळपावेतो गांधीजी भारतीय राजकारणात उतरले नव्हते. त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील रंगभेदाविरुध्द यशस्वी लढा दिला होता. भारतीय लोकांचं जे दमन होई त्याचा मुकाबला केला होता. ह्या साऱ्याचा जवाहरलालांवर प्रभाव पडला होता, पण जवळीक मात्र वाटली नव्हती.

गांधीजींनी चंपारण्यच्या शेती मजुरांसाठी आंदोलन छेडल्यावर मात्र त्याच्या जवळ पोहोचण्याची जवाहरलालांना इच्छा झाली. त्यांच्या बरोबर काम करावंसं वाटू लागलं. त्यानंतर 1919 मध्ये गांधीजींनी रोलॅट ॲक्ट विरुध्द सत्याग्रह पुकारला. जवाहरलालांना ते खूप आवडलं. सफल संघर्षाचा

मोतीलाल नेहरूदेखील आंदोलनात सामील झाले.

मार्ग आता हाती गवसला असं जवाहरलालांना वाटलं. त्यांना केवळ चर्चा आणि भाषणांचं राजकारण रूचत नसे. लढा आणि तुरुंगवास आवडला. पण हा मार्ग त्यांचे पिता मोतीलाल यांना पसंत नव्हता. म्हणून गांधीजींच्या सल्ल्यावरून ते लढ्यात उतरायचे थांबले.

जवाहरलालांना फार वेळ वाट बघावी लागली नाही. कारण थोड्याच कालावधींत स्वतः मोतीलालही गांधीजींच्या चळवळीत सामील झाले. अमृतसरच्या जालियांवाला बागेत चाललेल्या सार्वजनिक सभेत जनरल डायरने गोळ्या चालविल्या. शेकडो माणसं मेली. निशस्त्र लोकांवर अत्याचार झाले. देशभर खळबळ माजली. ह्या प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती बनवली गेली. तिच्यात गांधीजी आणि मोतीलाल दोघेही बरोबर होते. जवाहरलाल त्या समितीचे मंत्री होते. तेव्हाची साथसंगत आयुष्यभर राहिली.

गांधीजींच्या विचारांचा जवाहरलालांवर खूप परिणाम झाला. सत्य आणि अहिंसा त्यांना सुसंस्कृत जीवनाचा पाया वाटत असत. नम्रतापूर्वक असहयोग ही पध्दतही त्यांना उपयुक्त वाटली. पण गांधीजींचा धार्मिकपणा मात्र त्यांना काही केल्या पटत नसे. अंतरात्म्याचा आवाज वगैरे म्हणणेही त्यांना रुचत नसे. ह्याचं कारण म्हणजे ह्या गोष्टी वादविवाद संपवून टाकणाऱ्याच होत्या. विचारांची देवाणघेवाण ही नेमका निर्णय घ्यायला मदत करणारी गोष्ट त्यांना वाटत असे. आतला आवाज पारखता येत नाही. गूळ गोड आहे हे चव घेऊन कळतं. विचार चांगला की वाईट ते तो दुसऱ्यापर्यंत पोहोचल्यावर कळतं. एका माणसाचा आतला आवाज हा दुसऱ्याच्या आतला असूच शकत नाही. गुळाची अशी कुणालाही चव घेता येते तसाच विचारही दुसऱ्याला समजून घेता यायला हवा. असं झालं तरच तो चांगला की वाईट हे ठरू शकतं. असं ठरल्यावरच तो घ्यावा की त्यागावा हे कळतं.

कधीकधी तर दोघांमधलेही मतभेद अगदी तीव्र रूप घेत असत. तसे ते फेब्रुवारी 1922 मध्ये एकदा झाले. ते असहयोग थांबवण्यावरून. उत्तर प्रदेशातील चौरीचौरा गावात शेतकऱ्यांनी संतापून पोलिसचौकी पेटवून दिली. हिंसा घडत असल्याचं पाहून गांधीजींनी चळवळ थांबवली.

सत्याग्रहींना ही बातमी तुरुंगात कळली. सगळ्यांना खूप राग आला. जवाहरलालही खूप संतापले. त्यांनी गांधीजींना संतापातच पत्र लिहिलं. पण गांधीजींनी शांतपणे समजवून सांगितल्यावर सगळ्यांची समजूत पटली.

1927 साली मद्रास येथील काँग्रेस झाली तेव्हा गांधीजी उपस्थित राहिले नाही. जवाहरलालांनी त्यात एक ठराव पास करवून घेतला तो गांधीजींना आवडला नाही. 'काँग्रेसचं ध्येय भारताला स्वतंत्र करणं हेच आहे' असा तो ठराव होता. पुढच्या वर्षी कलकत्ता येथील काँग्रेसमध्ये गांधीजींनी हा प्रस्ताव बदलायला लावला. पण 1929 मध्ये जवाहरलाल काँग्रेसचे अध्यक्ष झाल्यावर 'संपूर्ण स्वराज्य' हेच काँग्रेसचं ध्येयधोरण असल्याचं मान्य झालं. तेव्हा गांधीजीही सहमत झाले.

असाच आणखी एकदा मतभेद झाला तो 1936-37 मध्ये सर्वांना जाणवला. जवाहरलालांना स्वतंत्र भारताची ध्येयधोरणे ठरवायची होती. गांधीजींचं ह्यावर म्हणणं असं होतं की आधी स्वातंत्र्य मिळू देत मग इतर सगळे निर्णय घेता येतील. जवाहरलालांनी त्यावेळी गांधीजींना लिहिलं, "ध्येयच समोर स्पष्ट नसेल तर पावलं कशी उचलली जातील?" त्यावर गांधीजींनी उत्तर दिलं: "जी पावलं उचलत आहात त्यावर एकाग्र व्हा. जर पावलंच नीट पडली नाहीत तर ध्येय समोर असण्याचा काहीच उपयोग होणार नाही."

ह्या मतभेदाची सोडवणूकही आयुष्यात पुढे अशीच झाली. जवाहरलालांच्या लक्षात आलं की पुढचे निर्णय घेतल्याने काही काँग्रेसची एकी राखली जाईल असं नव्हे. स्वतंत्र भारताचं चित्र प्रत्येकाच्या मनात वेगवेगळंच होतं. ह्या मतभेदाचा फायदा बाहेरील शक्तींना उचलता येणं शक्य होतं. म्हणून जवाहरलालांनी आपल्या समाजवादी आदर्श तत्त्वांचा प्रचार केला पण त्यांनी काँग्रेसवर ते लादले नाहीत.

6
शेतकरी शक्ती

जवाहरलालांवर गांधीजींचा जादूसारखा प्रभाव पडला होता हे आपण पाहिलंच. पण ह्याचं कारण काय होतं? तर गांधीजींनी स्वातंत्र्य लढ्याला जनतेचा लढा असं स्वरूप दिलं होतं. जवाहरलालांना सभागृहांमध्ये बसून केलेलं चर्चीचं राजकारण आवडत नव्हतंच. त्यांना काहीतरी करायचं होतं. काहीतरी भरीव असं काम. ह्याची वाट दाखवली गांधीजींनी. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना, "खेड्यांत जाऊन, शेतकऱ्यांमध्ये राहून त्यांना समजून घ्या." असे सांगितले.

स्वातंत्र्य लढा गांधीजींना तलवार, बंदुकीच्या गोळ्या, बॉम्ब ह्यांच्या मदतीने द्यायचा नव्हता. त्यांना जनतेच्या शक्तीवर विसंबून राहायचं होतं आणि भारतासारख्या देशात अशी शक्ती खेड्यांमध्येच आढळणार होती.

जवाहरलालांच्या हे लक्षात आल्यावर त्यांनी कलकत्त्याला विद्यार्थ्यांना हे अशा प्रकारे समजावून सांगितलं, "कुठलीही चळवळ ही जनतेची झाल्यावरच यशस्वी होते. भारत खेड्यांचा, शेतकऱ्यांचा देश आहे हे तुम्ही ध्यानी घ्यायला हवं. ह्या ठिकाणी शेतकरी, शेतमजुरांना सामावून घेऊन उभी राहाणारी चळवळच वाढू शकते आणि यशस्वी होऊ शकते."

योगायोग असा की असहयोगाची चळवळ आणि शेतकरी शक्ती ह्या दोन्हींचा अनुभव जवाहरलालांना एकाचवेळी घडून आला. गांधीजींच्या सत्याग्रह सभेत जरी ते स्वेच्छेने उतरले असले तरी शेतकरी शक्ती त्यांना अकस्मातपणेच दिसून आली.

1920 सालच्या जून महिन्यातली हकीकत. प्रतापगड जिल्ह्यातल्या जवळजवळ दोनशे शेतकऱ्यांचा जथा अलाहाबादला आला. मोठमोठ्या नेत्यांपुढे त्यांना आपले म्हणणे मांडायचे होते. यमुनेच्या घाटावर ही मंडळी बसून होती. जवाहरलालांना हे कळल्यावर आपल्या काही सहकाऱ्यांना घेऊन ते भेटीला गेले.

शेतकऱ्यांनी त्यांच्यावर होणारा जुलूम मोकळेपणाने त्यांना सांगितला. तगाई त्यांना भरता येत नव्हती एवढी होती. कर्जाच्या ओझ्याने कंबरडं मोडलं होतं. जमीनदार आणि पाटील मजुरी करायला लावीत असत, नजराणे मागीत असत. दिलं नाही तर पोटापाण्याची कणाइतकी सोय असे तीही काढून घेत.

हे शेतकरी ज्या नेत्यांच्या भेटीसाठी आले होते त्यांच्याशी त्यांची भेट होऊ शकली नव्हती. जवाहरलालांना त्यांनी, "आमच्यासोबत चला." असे सांगितले. जवाहरलालांना ह्याची कल्पना नव्हती त्यामुळे ते तयार नव्हते. पण



नेहरू आणि गांधीजी लोकांसमवेत

शेतकरी काही केल्या ऐकेनात. म्हणाले, "सरकार तुम्ही आमच्याबरोबर आला नाहीत तर आम्ही मारले जाऊ. तुम्ही येऊन तर पहा, आमच्यावर कायकाय जुलूम होतो आहे. आम्हाला पाटलाच्या जुलमातून वाचवा. तो आमच्यावर खूप रागावून असतोच. आता तर आम्ही अलाहाबादला आलो आहोत म्हणून आणखीही राग धरून आहे."

हे सारं ऐकल्यावर जवाहरलालांना त्यांच्यासाठी काहीतरी करावंसं तीव्रतेने वाटू लागलं. त्यांनी दोन दिवसांनंतर आपण येत असल्याचं वचन तत्काळ त्यांना देऊन टाकलं.

वचन पूर्ण करण्यासाठी त्यांना घेऊन जवाहरलाल त्या गावांमध्ये गेले. तीन दिवस ते गावोगावी हिंडले. असा उकाडा आणि उन्हाच्या झळा ह्यापूर्वी कधीच अनुभवल्या नव्हत्या. आता ते सहन केल्यावर जवाहरलालांना आपल्या शारीरिक शक्तीचीही अधिक ओळख पटली.

ह्याहून मोठी एक गोष्ट म्हणजे त्यांना शेतकऱ्यांच्या सतत पोटाला चिमटा घ्यायला लावणाऱ्या गरिबीचं दाहकपणे दर्शन झालं. इतक्या गरिबीतही लढत रहाण्याची अपरंपार ताकद त्यांच्यात असल्याचं जवाहरलालांनी पाहिलं. आधार मिळताच ते चटदिशी उभे राहू शकतात हे दिसलं. जवाहरलालाच्या मनात आलं की ही शक्ती जपली तर स्वातंत्र्य लढ्यात तिचा खूप उपयोग होऊ शकतो.

शेतकरी चळवळीशी अशा प्रकारे जोडले गेल्यामुळे जवाहरलालांचं जणु आयुष्यच बदललं. त्यांनी ह्याबद्दल लिहिलं आहे की हा प्रसंग जर आयुष्यात आला नसता तर कोण जाणे आयुष्याची दिशा कुणीकडे वळली असती.

तर जवाहरलाल वचनानुसार त्या खेड्यांमध्ये गेले. तीन दिवस तेथे हिंडले. शेतकऱ्यांच्या दुःखांच्या, अन्यायाच्या कहाण्या त्यांनी मन लावून ऐकल्या. जमीनदार आणि पोलिसांनी केलेल्या अत्याचारांच्या घटनाही त्यांना ऐकायला मिळाल्या. शेतकरी रात्रंदिवस शेतात काम करीत. घाम गाळीत, पिकं काढीत असत. त्यानंतर त्यांना सांगण्यात येई ते पीक त्यांचं नाही म्हणून. मग त्यांना शेतावरून काढून टाकलं जाई. स्वतःच्या घराबाहेर काढलं जाई. का ? कारण जमीनदाराला हवी तेवढी तगाई देणं त्यांच्या कुवतीबाहेरचं होतं म्हणून.

भारतातील दारिद्र्य आणि असहाय्यतेचं असं विदारक रूप जवाहरलालांना ह्यावेळी प्रथमच पाहायला मिळालं. आपल्या 'आत्मकथे'त त्यांनी ह्या संदर्भात लिहिलं आहे . "भारताचं एक नवीनच प्रकारचं चित्र माझ्यासमोर येऊ लागलं. नागड्या, भुकेल्या, दलित आणि दुःखी भारताचं चित्र." हे पाहून त्यांना अतिशय दुःख झालं. आजुबाजूला इतकं दैन्य-दारिद्र्य असताना आपण कसे चैनीत राहातो ह्या विचाराने स्वतःचीच शरम वाटली.

जवाहरलाल आणि त्यांचे सहकारी खेड्यांमध्ये गेले की माणसं लगेचच गोळा होत असत. सभा भरे. सांगोवांगी ह्या बातम्या इतर गावांमध्ये पोहोचत. ते येऊन पोहोचायच्या आधीच लोक मैदान, शेत, पारावर येऊन बसत. कोणत्याही फर्मान किंवा दवंडीशिवाय अशा तऱ्हेने मोठमोठ्या सभा झाल्या. सभेला अख्खा गावच्या गाव येऊन बसलेला दिसे. लहानथोर, स्त्री-पुरुष, सारे येत. त्यांच्या अंगावर धड कपडे नसत. पण डोळ्यांत मात्र चमक असे. येथे आपल्या समोर असलेला नेता आपलं दुःख-दारिद्र्य नक्कीच दूर करणार आहे ह्याचा विश्वास, खात्री त्यांना वाटत असे. त्यांच्या मनीचा हा भाव पाहून त्यांच्यासाठी काहीतरी करावे असे जवाहरलालांच्या मनाने घेतले. थोडी भीतीही मनात आली, "हे सारं आपल्याला जमेल का ?"

तेथून ते मसूरीला परतले कारण त्यांच्या कुटुंबातली माणसं तेथे उन्हाळा घालविण्यासाठी गेली होती. पण जवाहरलालाच्या डोळ्यांपुढे मात्र शेतकऱ्यांच्या जीवनातली चित्रं फिरत होती. तेथून परतल्यावर ते पुन्हा त्या गावांमध्ये गेले. शेतकरी चळवळीने जोर धरला. शेतकऱ्यांमध्ये त्यांनी नवीन जाणीव रुजविली. स्वतःवर विश्वास ठेवायला शिकविले. आपली प्रतिष्ठा आता शेतकऱ्याच्या लक्षात येऊ लागली, हवीशी वाटू लागली.

1921 सालच्या जानेवारीतली ही गोष्ट. रायबरेलीच्या शेतकऱ्यांकडून जवाहरलालांना तार आली. पोलिसांनी काही शेतकरी नेत्यांना अटक केली होती. ते रायबरेली तुरुंगातच होते. जवळपासच्या जिल्ह्यांमधले शेतकरी मोर्चा काढून झाल्या घटनेचा निषेध नोंदवित होते. त्यांना पोलिसांनी नदीपल्याडच थोपवून धरलं होतं. जवाहरलाल सरळ तेथे धडकले.

गेल्यावर त्यांच्या लक्षात आलं की तेथे गोळीबार चालला आहे

जवाहरलाल आलेले पाहून जवळपासच्या शेतांमध्ये दडलेले शेतकरी बाहेर निघाले. त्यांनी त्यांच्याभोवती कडे केले. सभा जमली. जवाहरलालांचं भाषण झालं. त्यांनी शांतता ठेवायला सांगितलं. नदीपल्याड ह्या शेतकऱ्यांच्या बाधवांवर गोळीबार होत होता, रक्त वहात होतं. तरीही त्यांच्यापैकी कोणीही गोळीबार करणाऱ्यांवर हात उगारला नाही.

ह्याहून मोठी अहिंसा आणखी काय असणार !

अशीच एक घटना फैजाबाद जिल्ह्यातही घडली. तेथे शेतकऱ्यांनी एका तहसीलदाराचं घर लुटलं. नंतर समजलं की त्यांना कोण्या जमीनदाराने भडकवलं होतं. त्या शेतकऱ्यांच्या मनात असं भरवलं होतं की गांधीजींचीच तशी इच्छा आहे. म्हणून लुटालूट करतांना त्यांनी "महात्मा गांधीजी की जय" अशा घोषणाही दिल्या.

जवाहरलाल तेथे पोहोचल्यावर त्यांनी सभा बोलाविली. थोड्याच वेळेत पाच-सहा हजारांचा समुदाय जमला. जवाहरलालांनी त्यांना सुनावलं, "तुम्ही आमच्या तोंडाला काळोख फासला आहे. जे-जे लोक ह्या लुटमारीत सामील होते त्यांनी आपापले हात वर करावे." जवाहरलालांनी ह्या संदर्भात असं लिहिलं आहे की 'दोन डझन लोकांनी आपले हात वर केले. तेथे उभे असलेले पोलिस बघत होते. हात उंचावणाऱ्यांना अटक करता येत होती. पण त्यांनी खरं सांगितलं होतं.

भारतीय शेतकऱ्यांचं हे रूपही नेहमीसाठी जवाहरलालांच्या मनावर कोरलं गेलं. त्यांना हे शेतकरी म्हणजे आपली शक्ती आणि जबाबदारी दोन्ही वाटत असत.

7

तुरुंगवास

तुरुंगात जाणारा अपराधी ठरतो. समाजाचे नियम तोडणाऱ्याला, तुरुंगात पाठवलं जातं. नियम मोडणारा समाजहिताला घातक ठरतो म्हणून समाजाची काळजी वाहणारे त्याला तुरुंगात टाकतात.

पण नेहमीच असं नसतं. अनेकदा नियम मोडणारेच समाजाचे मक्तेदार होऊन बसतात. तेव्हा योग्य नियमांना धाब्यावर बसवून चुकीचे नियम घडविले जातात. त्याला आपण दमन दडपण असं म्हणतो. अशा परिस्थितीत दमन आणि दडपणाच्या विरुध्द आवाज उठविणाऱ्याला मात्र तुरुंगात डांबलं जातं.

भारतात इंग्रजी शासनकाळात अशीच परिस्थिती होती. ती सत्ता नियमांच्या विरुध्दच कारभार करीत होती. कोणाही एका माणसाला किंवा जमातीला दुसऱ्यांचे हक्क हिसकावून घेणाचा हक्कच नाही. जवळजवळ 11 हजार कि.मी. लांबून येऊन भारतावर राज्य करणाऱ्या इंग्रजांनी भारताचा हक्क हिसकावून आपल्या ताब्यात घेतला. भारतीयांना आपला हक्क परत हवा होता. दबाव-दडपण इंग्रजांकडून होता. समाजाचे नियम त्यांनी मोडले होते. पण भारतीयाकडून लुबाडलेला त्यांचा हक्क इंग्रजांना स्वतःचा हक्क वाटत असे.

त्यामुळे स्वतःचा हक्क परत मिळवू इच्छिणाऱ्या भारतीयांना हे सत्ताधारी आपले शत्रू मानीत. आपला दबदबा कायम ठेवण्यासाठी ते अशांना तुरुंगात टाकीत. भारतातील अनेक देशभक्तांना तुरुंगात जावं लागलं. स्वातंत्र्यासाठी

जे लोक तुरुंगात गेले त्यांना जग गुन्हेगार मानीत नाही तर त्याच नाव सर्वत्र आदराने घेतलं जातं.

स्वातंत्र्यासाठी तुरुंगात जाणाऱ्यांमध्ये जवाहरलाल नेहरूंचा पुढाकार होता. 1921 ते 1946 पर्यंतच्या काळातल्या पंचवीस वर्षांमधली जवळजवळ दहा वर्षे त्यांनी तुरुंगवासात काढली. ते एकंदरीत नऊ वेळा तुरुंगात गेले. त्यांच्या आयुष्यातले 3262 दिवस निरनिराळ्या तुरुंगात गेले. त्यापैकी काही तुरुंग लखनऊ, नाभा, नैनी, अलाहाबाद, बरेली, डेहराडून, कलकत्ता, अल्मोडा, गोरखपूर, आणि अहमदनगर येथील किल्ल्यातील असे आहेत.

तुरुंगातील आयुष्य काही सुखद नसतं. माणूस जगापासून तोडला जातो. आपल्या प्रिय माणसांपासून तोडला जातो. त्यांच्या सुखदुःखात तो सहभागी होऊ शकत नाही. जवाहरलालही त्यांच्या आजारी पित्याची आणि पत्नीची सेवा करू शकले नाहीत. लाडक्या लेकीच्या वाढदिवसाला तिला भेट देऊ शकले नाही. ह्या सगळ्यामुळे त्यांच्या मनाला केवढ्या यातना झाल्या असतील, हे त्यांनाच ठाऊक. आपण केवळ कल्पनाच करू शकतो.

जवाहरलालांनी तुरुंगातील आयुष्याबद्दल लिहिलं आहे : "आयुष्य कंटाळवाणं झालं आहे. अगदी बेचव झालं आहे. सर्वदूर पसरलेल्या वाळवंटासारखंच हे वाटतंय. अशा वाळवंटासारखं की जेथे तळपत्या उन्हापासून स्वतःला वाचवायला सावली देणारं एकही झाड किंवा टेकडी परिसरात नाही."

पण तुरुंगात जावं लागण्याबद्दल त्यांची तक्रार नव्हती. एक महान कार्यासाठी हा त्याग आहे हे त्यांना ठाऊक होतं. देशप्रेमापोटीच हे करावं लागतं आहे, ह्याची त्यांना जाणीव होती. तुरुंगात घालवलेले दिवस आठवून ते स्वतःलाच प्रश्न विचारीत: "हे चुकलं का ?" ह्या प्रश्नाचं उत्तर द्यायला त्यांना जराही वेळ लागत नसे. 'आत्मकथे'त त्यांनी लिहिलं आहे "पुन्हा अशी वेळ आल्यावर मी पुन्हा तुरुंगवासच पत्करीन."

तुरुंगवासामुळे त्यांच्या मनातही निराशा वा कटुता अशी कधी भरून राहिली नाही. ह्या काळाचा सदुपयोग त्यांनी आपल्या आदर्शांकडे वाटचाल करण्यासाठी केला. बाहेर एरवी जे करता येत नसे ते तुरुंगात केलं. बाहेर वेळ कमी असे. भेटणाऱ्यांची सतत वर्दळ राही. इकडे तिकडे स्वतःला जावं लागे. सभा असत. विचार करायला, लिहायवाचायला वेळ फारच अपुरा पडे. त्यांना फुलांची, झाडांची, पाळीव प्राण्यांचीही आवड होती. पण त्यांची सेवा मात्र करता येत नसे.

तुरुंगात मात्र हे सर्व करायची त्यांना संधी मिळाली. अहमदनगर किल्ल्याच्या तुरुंगातील आपल्या खोलीबाहेर त्यांनी फुलझाडं लावली. एका तुरुंगात एका आजारी कुत्र्याची काळजी घेतली. त्यांच्या मनात त्या कुत्र्याबद्दल नेहमीच आभाराची भावना राहिली.

ह्या सगळ्याहून मोठी बाब म्हणजे तुरुंगात त्यांना लेखन करायची संधि मिळाली. त्यांचे तीन मोठे ग्रंथ ह्या तुरुंगांचीच देणगी आहेत. त्यांची नावं 'आत्मकथा', 'शोध भारताचा', आणि 'जगाचा इतिहास' ह्यात भारताचा स्वातंत्र्य लढा, भारताचा इतिहास आणि मानव समाजाच्या विकासाचे अत्यंत

अलमोडा तुरुंगाची कोठडी

सुंदर चित्रण आहे. ह्यासाठी भारतातच केवळ नव्हे तर साऱ्या विश्वाला त्याची आठवण राहील.

तुरुंगात जाण्याआधी प्रत्येक वेळी खटला चालत असे. ते त्यात भाग घेत नसत, आपली बाजू मांडीत नसत. कारण आपल्याला तुरुंगात पाठवायचा निर्णय आधीच ठरला आहे. 'बाजू मांडणं' हा केवळ देखावा आहे हे त्यांना ठाऊक असायचं. त्यामुळे ते खुलाशाऐवजी जबानी देत असत. त्यात सत्ताधाऱ्यांचं पितळ उघडं करीत.

1921 साली जवाहरलालावर पहिला खटला चालला. काँग्रेसकडून सेवादले तयार करून त्यात कार्यकर्त्यांची भरती होत होती. सत्ताधाऱ्यांना हे कायद्याच्या विरुद्ध वाटत होतं. ह्याच खटल्यात त्यांनी न्यायालयात इंग्रजांविरुद्धच आपलं मत मांडलं.

न्यायालयाच्या एका प्रश्नाच्या उत्तरात जवाहरलाल म्हणाले, "मी भारतातील इंग्रजी सत्ता मान्य करीत नाही. आणि ह्या न्यायालयाला न्यायालय मानीत नाही. येथे घडतय ते केवळ देखावा, तमाशाच तेवढा आहे. ह्या न्यायालयाला जे करायचा आदेश मिळाला आहे तेवढच ते करू शकणार आहे."

पहिल्या तुरुंगवासाच्या वेळी ते ३ मार्च 1922 रोजी सुटून आले. आल्यावर लगेच परदेशी कपड्यांवरील बहिष्काराचा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला. कापडविक्रेत्यांना ते परदेशी माल न आणण्याबद्दल सांगत. इंग्रजी सत्तेला हा गुन्हा वाटत असे. मे महिन्यात खटला चालला. त्यात त्यांनी दीर्घ अशी जबानी दिली ती कधीच विसरली जाणं शक्य नाही. जवाहरलाल म्हणाले:

"मी स्वतःला मोठाच भाग्यवान समजतो. स्वातंत्र्य लढ्यात देशाची सेवा करणं ही फार मोठी बाब आहे. आणि महात्मा गांधींसारख्या नेत्यांच्या मार्गदर्शनात ही सेवा करणं ही तर फारच मोठी भाग्याची गोष्ट. एका भारतीयाला आपल्या प्रिय देशासाठी संकटं झेलण्याहून मोठं सुदैव आणखी कोणतं असेल? याहून मोठी एकच गोष्ट असू शकते आणि ती म्हणजे देशाची सेवा करीत मृत्यू येणं."

नैनी तुरुंग

तिसरा तुरुंगवास नाभा येथे बारा दिवसांचा घडला. त्यावेळी तेथला न्यायाधीश निरक्षर असल्याचं त्यांना आढळलं. चौथा तुरुंगवास मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतल्याच्या अपराधावरून त्यांना घडला.

चौथ्या तुरुंगवासातून सुटून आल्याच्या आठ दिवसांनंतर लगेचच त्यांना पुन्हा तुरुंगात रवाना करण्यात आलं. ह्यावेळी त्यांच्यावर आरोप होता तो सरकारविरुध्द जनतेला चिथवण्याचा.

त्यावेळी जवाहरलाल काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली लाहोर येथील काँग्रेसने 'संपूर्ण स्वातंत्र्या'चा ठराव पास केला होता. त्यांनी इंग्रजी सत्तेसमोर खुलासा केला नाही.

न्यायालयाला त्यांनी सांगितलं , "मी भारतीय जनतेचा सेवक आहे. कोणा इतरांना मी माझा मालक मानत नाही."

ते असंही म्हणाले , "इंग्रजी जनतेशी आमचा विरोध नाही. फक्त साम्राज्यशाहीलाच आहे. त्याला आमच्यासारखीच इंग्रजी जनता आणि कामगारही बळी पडत आहे. ते साम्राज्य आणि ब्रिटनला आम्ही वाहिलेलं नाही. येथे ब्रिटनचं निशाण हा आमचा अपमान आहे. मी फक्त भारतीय जनतेसाठी स्वतःला वाहून घेतलं आहे. कोणाही बादशहा किंवा परदेशी सत्तेशी मी इमान राखणार नाही."

जवाहरलालांना शासनाचा आदेश धुडकावून लावला. ते सहाव्यांदा तुरुंगात गेले. अलाहाबादच्या सीमेबाहेर ते जाऊ शकत नाहीत असा त्यांना आदेश मिळाला. ह्यावर न्यायालयात जाऊन ते म्हणाले : "मी काँग्रेसचा अध्यक्ष आहे. कितीतरी इतर समित्यांवरही आहे. ह्यापैकी माझ्या कोठल्याही कामात मी अडचण येऊ देणार नाही."

ते असंही म्हणाले की "स्वतःच्या कामांसाठी मी फक्त काँग्रेसचाच आदेश पाळू शकतो. न्यायालयाला हवं असेल तर हा सरकारी आदेशही मी काँग्रेसपुढे ठेवीन. मग काँग्रेस जे ठरवील ते मी मान्य करीन."

न्यायालयाने त्यांना दोन वर्षे सक्त मजुरी आणि 500 रु. दंड ही शिक्षा ठोठावली. दंड वसूल करण्यासाठी त्यांची मोटार लिलावात काढली.

अशा प्रकारे ते निर्भयपणे बोलत असत. देशाच्या सन्मानाला प्राधान्य देताना तुरुंगवास घडो की घर लुटलं जावो, ते पत्करीत असत.

तुरुंगाबाहेर जवाहरलाल

४

पिता-पुत्र संबंध

जवाहरलालाचे पित्याशी असलेले नाते हा त्यांच्या आयुष्यातील विलक्षण पैलू आहे. पिता पुत्र परस्परांचे मित्र होते. त्यांच्या नात्यात आदरभाव होता. प्रेम होतं, पण भीतीला तेथे थारा नव्हता. ते एकमेकांशी अत्यंत मोकळेपणाने बोलत. दोघांचाही परस्परांवर प्रभाव होता. तो लक्षात घेतला की जवाहरलालांचा परिचय करून घेणे काहीसे सोपे होईल.

मोतीलाल नेहरू हे यशस्वी वकील होते. बरंच कमवीत असत. त्यामुळे सुखाचं, आनंदाचं आयुष्य घालवावंसं त्यांना वाटणंही स्वाभाविक होतं. घरात निरनिराळी देशीविदेशी पक्वान्नं तयार होत. मित्रमंडळी येई. पगती झडत. सुखसोयींच्या साधनांमध्ये 'आनंद भवन' मध्ये नसेल अशी चुकूनच एखादी वस्तू त्यावेळी असावी. "आम्ही काय कुणापेक्षा कुठे कशात कमी आहोत का ?" असा भाव काही न सांगताही त्या घरात भरून राहिलेला होता.

आपला पुत्र जवाहरलाल यालाही ते असंच आयुष्य मिळवून देऊ इच्छित होते. त्यासाठी शरीर आणि बुध्दी सुदृढ रहाण्यासाठी त्यानी सगळ्या सोयी त्यांना पुरविल्या. घोडेस्वारी शिकण्यासाठी काही घोडे आणि मोतद्दार होते. पोहोण्यासाठी घरातच तलाव होता. बुध्दी धारदार करण्यासाठी उत्तमोत्तम शिक्षक होते. परदेशात उत्तमात उत्तम प्रकारचं शिक्षण त्यांना दिलं गेलं.

पण तरीही जवाहरलाल आपल्या पित्याची इच्छा पूर्ण करू शकले नाहीत. मोतीलालांच्या मनात त्यांना जसं घडवायचं होतं तसे ते झाले नाहीत. भाषा



पिता-पुत्र

आणि खाण्यापिण्यातली जवाहरलालाची अभिरूची उच्च प्रतीची होती. स्वच्छतेची त्याना खूपच आवड होती. पण त्याहूनही अधिक त्यांना काही हवं होत. देशसेवेची भावना त्याच्या मनात खूप बळकटपणे वसत होती. त्यासाठी सार काही सोडायची त्यांची तयारी होती.

मोतीलालाचा देशसेवेला विरोध नव्हता. त्यानाही राजकारणात रस होता पण त्यामुळे आपल्या पेशाला कुठे आडकाठी यावी हे मात्र त्याना मंजूर नव्हतं. म्हणून राजकारणा संबंधीच्या त्याच्या गप्पा केवळ जेवणाच्या मेजापर्यंतच रहात किंवा कधीकधी ते एखाद्या सभा संमेलनात भाग घेत. फक्त मोतीलालच असं करीत नसत तर त्यावेळची सारीच माणसं तसं करीत.

मोतीलालांच्या मनात होतं की जवाहरलालाचही राजकारण एवढ्यापुरतंच असावं. भारतात काय चाललंय ह्याबद्दलची माहिती ते स्वत: आपल्या ह्या मुलाला देत. आठवड्यातून एकदा पत्र लिहित त्यात साऱ्या विशेष बातम्या लिहित. आपला पुत्र संघर्षाचे राजकारण खेळणाऱ्या इतक्या कठीण वाटेने वाटचाल करू लागेल हे तर त्यांच्या कधी स्वप्नातही आलं नसावं.

जवाहरलालांना असल फावल्या वेळचं राजकारण मुळीच पसंत नव्हत. त्याच्या मनात देशप्रेमाच्या आगीचा डोंब उसळला होता. त्यांना काहीतरी विशेष करायचं होतं. ते समाजाला बदलू पाहात होते, पण केवळ भाषण ठोकून नव्हे तर समाजाला जागृत करून.

कशा पध्दतीच्या राजकारणात भाग घ्यावा ह्याबद्दल पिता-पुत्रांमध्ये एकवाक्यता नव्हती. त्यामुळे सुरुवातीला दोघांतही तणाव असे. वादविवाद असत. मोतीलालाच्या पदरी कदाचित निराशाही पडली असेल. त्यांचा पुत्र पुष्पशय्येचा त्याग करून काट्याकुट्यांनी भरलेल्या मार्गावर निघाला होता. त्यांची पत ध्यानी घेऊन मोठमोठ्या रकमेची फी मिळवून देणारे खटले मुलाला मिळू लागले. मोतीलालाना मिळालेली पहिलीवहिली फी पाच रुपये होती तर जवाहरलालजींना मिळालेली पहिली फी पाचशे रुपये होती. पण

त्यांना कुठे वकिलीत रस वाटत होता? थोड्याशाच कालावधीत सगळ काही सोडून त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली.

मोतीलालांना वाटणारी निराशा काही काळापुरतीच होती. कारण अल्पावधीतच त्यांनाही जवाहरलालांच्या आग्रहाचा अर्थ समजला. गांधीजींच्या प्रभावाचाही त्यात खूपच भाग होता. नंतर मात्र ते स्वत:ही सर्व सुखसोयींचा त्याग करून जवाहरलाल वाटचाल करीत असलेल्या कठीण मार्गावर येऊन मिळाले. मग तर पिता-पुत्र एकाच वाटेने जाणारे वाटसरूच होते. घरात होत्या-नव्हत्या त्या सर्व विदेशी कापडांची होळी असहयोग चळवळीच्या काळात त्यांनी केली.

1907च्या घटना पाहिल्या की पिता-पुत्रांच्या राजकारणाबद्दलच्या आवडी निवडींमधील फरक लक्षात येतो. मोतीलालाना उत्तर प्रदेश कॉंग्रेस संमेलनात सभापती करण्याचं निश्चित झालं होतं. जवाहरलालांना त्यांनी लिहिलं : "मी हे पद नाइलाजाने स्वीकारीत आहे. माझ्यासाठी हे सारच नवीन आहे. मित्रमंडळीच्या माझ्याकडून ज्या अपेक्षा आहेत त्या मी पूर्ण करू शकेन की नाही कुणास ठाऊक ?"

आपल्या वडिलांनी राजकारणात घेतलेला हा सक्रिय सहभाग पाहिल्यावर जवाहरलाल खूपच आनंदित झाले. त्यांनी उत्तर लिहिलं . "ह्या नव्या कामातही आपण नेहमीसारखेच यशस्वी व्हाल असा मला विश्वास वाटतो. ह्या कामात यायला आपण मुळातच उशीर केला आहे. मला वाटतं की हा उशीर पुढे आपल्याला उत्साह मिळवून देईल."

जवाहरलालांना सोयी आणि काळजी घेण आवडत नसे म्हणून मोतीलालाना कायम चिंता लागून राहात असे. त्यांनी पुत्राला लिहिलं की विद्यापीठात 'मजलिस' पासून लांब राहावे. 'मजलिस' ही भारतीय विद्यार्थ्यांची संघटना होती. त्यात भारतीय राजकारणावर चर्चा घडत. जवाहरलाल मात्र त्यापासून लांब राहिले नाहीत. त्यांनी ते सार जवळून पाहिलं पण त्याचा स्वत:वर प्रभाव मात्र पडू दिला नाही. तेथ चर्चा अधिक असत

आणि काम मात्र अगदीच थोडे.

भारतीय राजकारणात दोन प्रकारची माणसं होती. कायद्याच्या सीमारेषेत राहून हक्कांची मागणी करणारा एक प्रकार आणि दुसरा हक्कांसाठी भांडू इच्छिणाऱ्यांचा. पहिल्याला 'मवाळ गट' आणि दुसऱ्याला 'जहाल गट' असं म्हटलं जाई. मोतीलालांची विचारसरणी मवाळ गटाशी मिळती जुळती होती तर जवाहरलाल जहाल गटाच्या जवळ पोहोचणारे होते. ह्या मतभेदामुळेही कधी कधी पिता-पुत्रामध्ये तणाव उत्पन्न होई. अशाच तऱ्हेचा कटू ठरणारा वाद त्या दोघांमध्ये 1907-8 साली झाला. तो संपवताना मोतीलालांनी लिहिलं : "मला तुझं राजकारण आवडत नाही. म्हणून कधीकधी मी स्वभावानुसार तिखट बोलून जातो. पण त्याला काही अर्थ नाही. माझ्या मनात तुझ्याविषयी अपरंपार प्रेम आहे. मी जोवर पूर्णपणे बदलत नाही तोवर ह्यात अंतर येणार नाही."

जवाहरलालांनी गांधीजींच्या निमंत्रणावरून सत्याग्रह सभेत सामील व्हायचा निर्धार केला. हा निर्णय मोतीलालांच्या दृष्टीने अतिशय कठीण होता. त्यांचा लाडका पुत्र तुरुंगात जावा हे त्यांना सहन होऊ शकलं नाही. त्यानं वाटल्यास चटणी-भाकरी खावी, भुईवर झोपावं पण त्याला तुरुंगात जावं लागू नये, हेच त्यांच्या मनात होतं.

जालियांवाला बागेतल्या आणि पंजाबातील अत्याचारांनंतर मात्र मोतीलालांचे विचार एकदम बदलले. आधी त्यांना वाटत असे की इंग्रज न्याय करतील, त्यांच्यावर विश्वास ठेवायला हवा. पण नंतर मात्र तो विश्वास संपुष्टात आला. आता ते कायद्याच्या मर्यादेत राहून लढा देण्याचा आग्रहही करीत नसत. आता ते आपल्या पुत्राप्रमाणे सरळ लढ्यात उतरले होते. त्यामुळे पिता-पुत्रांमध्ये असलेला मानसिक संघर्ष संपला.

याचा परिणाम म्हणजे 'आनंद भवन' मधील डामडौल संपला. थाटामाटाची जागा साधेपणाने घेतली. विदेशी आणि रेशमी कपड्यांऐवजी खादीचे कपडे अंगावर आले. जवाहरलालांच्या आयुष्यात अनेक प्रकारचे

यश आहे. आपल्या पित्याचे आयुष्य बदलले हाही त्यातला एक मोठा भाग आहे. त्यांनी एका धनिकाचे साधूत रूपांतर केले.

आनंद भवन

9

रशिया यात्रा

नेगोरेलोये स्टेशन होतं ते. रशियाच्या सीमेवर, युरोपच्या इतर देशांशी रशिया मिळतो तेथलं. स्टेशनवर बरीच गजबज होती. चारी बाजूंनी लाल निशाण फडकत होती. जागोजागी वेगवेगळ्या भाषांमध्ये लिहिलेलं होतं "सोविएत जनतेकडून पाहुण्यांचं स्वागत असो !"

ही गाडी नुकतीच आली त्यातून दोन विशेष आगंतुक उतरले. एक मोतीलाल नेहरू आणि दुसरे जवाहरलाल नेहरू. त्यांच्या सोबत जवाहरलालांच्या पत्नी कमला आणि बहीण कृष्णा याही होत्या. दोघी स्त्रिया भारतीय पध्दतीची साडी नेसून होत्या.

स्टेशनवर जमलेली माणसं या पाहुण्यांकडे मोठ्या प्रेमाने, आदराने, कुतूहलाने बघत होती. गाडीतून उतरताच पाहुण्यांना गर्दीने घेरलं. मोठमोठ्याने घोषणा दिल्या. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यांबद्दल रशियावासीयांच्या मनात विशेष आदर होता.

मोतीलालांना आपला देश आठवला. स्वातंत्र्याचा संदेश, गांधीजींचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी नुकताच त्यांनी देशभर दौरा केला होता. जेथेही ते जातील तेथे अशीच गर्दी त्यांचं स्वागत करीत असे. अशाच प्रकारचं प्रेम, असंच कुतूहल, असाच उत्साह त्यांना तेथेही दिसायचा.

मोतीलालांनी पुत्र जवाहरलालच्या कानात सांगितलं "तुला नाही वाटत हे लोक अगदी भारतातल्यासारखंच आपलं स्वागत करीत आहेत !"

जवाहरलालांनाही कदाचित तसंच वाटत असावं पण त्यांनी ते सार



जवाहरलाल मॉस्कोमध्ये 1927

हसण्यावारी नेत म्हटलं, "मला वाटलं की कमला आणि कृष्णाच्या साड्यांचं त्यांना आकर्षण वाटत असावं."

हसून बहुधा ते आपल्या मनात उचंबळत असलेल्या भावनांवर संयम ठेवायचा प्रयत्न करीत असावेत. रशियात क्रांती होऊन दहा वर्षे झाली होती. झारची हुकुमशाही संपून मजूर आणि शेतकऱ्यांचं राज्य आलं होतं. त्यामुळे जगभर खळबळ माजली होती. कोणी ह्याची अफाट स्तुती करीत तर कोणी कट्टर विरोध करीत.

जवाहरलालांनी ह्या संदर्भात पुष्कळ काही ऐकलवाचलं होतं. त्यांच्या मनात मजूर, शेतकऱ्यांचा राज्यकारभार बघायची उत्कट इच्छा होती. त्यांनी आपल्या ह्या बद्दलच्या भावना अशा प्रकारे व्यक्त केल्या : "चांगलं, वाईट कसंही म्हणा पण विळा-कोयत्याच ह्या देशाला मोठंच आकर्षण आहे, हे दृष्टीआड करून चालणार नाही. येथल्या मजूर आणि शेतकऱ्यांनी विरोधकांच्या प्रत्येक खेळीवर मात करून राज्यकारभार हातात घेतला आहे."

जवाहरलालांची इच्छा भारताला इंग्रज सत्तेच्या हातून स्वतंत्र करावं अशी होती. रशियाने झारशाहीतून मुक्त होऊन स्वातंत्र्य मिळवलं होत. त्यांच्या अनुभवाचा उपयोग भारतासाठी होऊ शकण्याची शक्यता होती.

रशियात समाजरचनेचा नवीन आराखडा तयार होत होता. सत्तेच नवीन रूप समोर येत होतं. समता, समानता स्थापन होत असल्याचं सांगितलं जात होतं. त्यातूनही बरचसं काही शिकण्याजोगं होतं.

त्यातून रशिया हे तर शेजारी राष्ट्र, बलवान शेजारी होतं. तिथं जे काही घडत असेल ते सारच समजून घेणं आवश्यक होतं. शेजारी मित्र असो की शत्रू, त्याच्याकडे डोळेझाक करून चालत नाही.

ह्या साऱ्याच गोष्टींमुळे तरूण जवाहरलालांच्या मनातील आकांक्षा आणि आवडींना धार चढत होती. भारताला स्वातंत्र्य मिळवून देऊन समाजाला नवी दिशा देण्याची इच्छा त्यांच्या मनात खोलवर रुजली होती. आपल्या मनातील आदर्शांच्या प्राप्तीसाठी जिथून-जिथून जे-जे शिकायला मिळेल ते-ते ते शिकू इच्छित होते.

म्हणूनच रशियन क्रांतीच्या दहाव्या वाढदिवसाला रशियात जाण्यासाठी

मिळालेले निमंत्रण त्यांनी तत्काळ मान्य केलं. त्यांना रशियाचं अनुकरण करायचं नव्हतं. प्रत्येक देश आपापल्याच पध्दतींनी पुढे जात असतो ह्या गोष्टीवर त्यांचा विश्वास होता. तरीही एक माणूस जसा दुसऱ्यांकडून काही ना काही शिकत असतो त्याचप्रमाणे प्रत्येक देशाला इतरांकडून शिकण्यासारखं असतं. अनुभव आणि विचारांच्या देवाण-घेवाणीतूनच मानवी जीवनाचा विकास होत असतो.

रशियात त्यावेळी फार काळ न घालवता तीन दिवसच ते राहिले. पण जे-जे काही त्यांनी पाहिल त्या साऱ्याचा त्यांच्या मनावर खूप खोलवर परिणाम झाला. भारतात परतल्यावर त्यांनी त्यावर बरेच लेख लिहिले. नंतर ते सारं लेखन पुस्तकरूपात छापलं गेल.

क्रांतीनंतरचा रशिया युध्दाचा नव्हे तर शांततेचा पाईक आहे ही गोष्ट त्यांना अतिशय मोलाची वाटली. त्यांनी लिहिलंय "सोविएत संघात मी जेथे-जेथे गेलो तेथे लोकांना शांततेचा ध्यास असलेला मला दिसला." याचं कारण जवाहरलालांना त्यांच्या गरजांमध्ये दिसलं. युध्दात रशियन सहज जिंकू शकत होते पण त्यानंतर नवीन समाजनिर्मितीत मात्र अडचणी आल्या असत्या. नवीन समाजनिर्मितीसाठी युध्द टाळणं अत्यंत आवश्यक होतं. जवाहरलालांचे हे विचार आजही पटतात. आज तर सगळं विश्वच हे मान्य करताना दिसतं.

त्यांना रशियात आवडलेली दुसरी गोष्ट म्हणजे समानतेची भावना. सगळे जण एकमेकांना 'तोवारिश' म्हणून हाक मारीत. ह्याचा अर्थ आहे 'कॉम्रेड' किंवा 'साथी'. स्टेशनावरचा हमाल, हॉटेलमधला नोकर, खेड्यातला साधा शेतकरी असो की कारखान्यातला मजूर, राष्ट्रपतींशी बोलत असताना तो त्यानाही 'तोवारिश'च म्हणायचा. राष्ट्रपतीही त्याला तसा संबोधत.

थोड्या वेळातसुध्दा जवाहरलालांनी ह्या नवीन पध्दतीच्या राज्यकारभाराची भरपूर माहिती करून घेतली होती. सामुहिक कृषी केंद्रावर जाऊन शेतकऱ्यांच्या विकासासाठी कसे प्रयत्न केले जात आहेत ह्याची माहिती करून घेतली.

भारताप्रमाणेच रशियातही निरनिराळ्या प्रकारचे लोक राहातात.

वेगवेगळ्या भाषा बोलतात. ते निरनिराळ्या धर्मांचे आहेत. त्यांच्या जेवणखाण्याचे, वेशभुषेचे, स्वभावाचे भिन्नभिन्न प्रकार आहेत. देशातल्या काही भागांचा खूप विकास झाला होता तर इतर काही, विशेषत: आशियातील प्रांत बरेच मागासलेले होते. त्या सगळ्यांचं मिळून एक राष्ट्र निर्माण होणं आपल्यासारखंच तेथेही कठिणच होतं. परंतु सगळ्यांना पुढे येण्यासाठी समान संधी दिली जाते आहे हे जवाहरलालांना अतिशय आवडलं. मागासलेल्यांकडे विशेष लक्ष पुरवलं जात होतं.

समाजात महिलांना समान संधी दिली जात होती. ह्याचा परिणामही जवाहरलालांच्या मनात खोलवर उमटला. साक्षरतेचा विकास गतिमान पध्दतीने होत असलेलाही त्यांना आढळला. सोविएत शासनाचा शिक्षणाच्या प्रसारावर भर होता. साक्षरता प्रसाराची गती पाहून तर ते चकितच झाले. भारतात आल्यावर जवाहरलाल म्हणाले, "सोविएत रशियात एका नवी समाजाची रचना होते आहे हे तेथील महिलांचा विकास आणि शिक्षणाचा प्रसार पाहून सहजच कुणाच्याही लक्षात येऊ शकेल."

जवाहरलालांनी सोविएत रशियाशी मैत्री केली. त्यांच्या अनुभवातून स्वत: धडे घेतले. आपल्या अनुभवाचे सार त्यांना दिले. भारत-रशिया शेजारी राष्ट्रे आहेत. शेजाऱ्यांमध्ये अनेकदा संशय आणि भ्रमांच्या भिंती उभ्या राहातात. जवाहरलालांनी ह्या भिंती उलथून पाडून वैचारिक देवाण-घेवाणीचं नवीन नातं स्थापन केलं. हे नातं केवळ उभय देशासाठीच नव्हे तर संपूर्ण विश्वासाठी फायद्याचं ठरत आहे.



11

गंगामाता

ह्या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणात जवाहरलाल म्हणजे भारताचं प्रतीक असं सांगितलं आहे. हे प्रतीकही गांधीजी किंवा गंगा ह्यांच्यासारखंच म्हणावं लागेल. भारतातून गंगा वेगळी काढता येत नाही, गंगेतून भारतही बाजूला काढता येत नाही.

"हम उस देश के वासी हैं जिस देश में गंगा बहती है" हे गाणं तुम्हा सर्वांनी निश्चितच ऐकलं असणार. ते तुम्ही वेळोवेळी म्हटलं किंवा गुणगुणतही असणार. गंगा ही काही आजच्या भारताचंच प्रतीक तेवढं नाही. गतकाळात आपण आठवू शकू तेवढ्या काळापासून गंगा ही आहेच आहे.

गंगेशी जवाहरलालांचं नातं खूपच खोलवर असं होतं. जन्मल्याक्षणापासून गंगेच्या पाण्याचा आवाज त्यांच्या कानी पडला असेल. 'आनंद भवन' ह्या त्यांच्या घरापासून मैलभर दूर अंतरावरून ती वहात होती. जवाहरलालांनी आपल्या मृत्युपत्रात लिहिलं : "माझ्या चितेतली मूठभर राख गंगेला अर्पण केली जावी अशी माझी इच्छा आहे."

त्यांची आई, मावशी, काकू गंगेचं महात्म्य सांगायच्या. त्यांची आई स्वरूपराणी तर सततच पूजाअर्चेत मग्न असत. गंगेवर स्नान करायला जाताना पुत्रालाही त्या सोबत घेऊन जात. त्यांच्या एका काकूजवळ तर पौराणिक कथांचा जणू खजिनाच होता. त्यांनी जवाहरलालांना गंगेच्या संदर्भातील बऱ्याच गोष्टी सांगितल्या. लहानपणी पाहिलेल्या, ऐकलेल्या ह्या गोष्टी त्यांच्या मनात खोलवर रुजल्या. गंगा जणू जवाहरलालांच्या

शरीराचाच भाग झाली.

जवाहरलालांना गंगेबद्दल वाटणारं प्रेम त्यांच्या आईला वाटत असे तशा प्रकारचं नव्हतं. ते गंगेवर जीव टाकीत, तिची पूजा मात्र करीत नसत. आपल्या चितेतली मूठभर राख गंगार्पण करण्याबद्दल सांगत असतानाच हे कोणत्याही प्रकारच्या धार्मिक पूजेच्या भावनेतून नाही हेही त्यांनी स्पष्ट केलं. एखाद्या मुलाला आपल्या आईबद्दल वाटेल तसंच त्यांना गंगेबद्दल वाटायचं. ते लिहितात , "अलाहाबाद जवळून वाहणाऱ्या गंगा-यमुनाबद्दल मला लहानपणापासूनच आपुलकी वाटते. मी जसजसा मोठा होत गेलो तसतशी ही आपुलकी आणखी वाढत गेली."

गंगेचं दर्शन घेतल्यानं किंवा तिच्या आठवणीनंसुध्दा त्यांच्या मनाला मोठा धीर यायचा. आपले आई-वडील, पत्नी, जावई अशा आवडत्या व्यक्तींच्या चितेतली राख त्यांनी गंगार्पणच केली होती. त्यांना आवडणारी गंगा अलाहाबाद जवळची होती. म्हणूनच केवळ ते हिमालयाच्या शिखरांपासून बंगालच्या खाडीपर्यंत वाहणाऱ्या अखंड गंगेवर प्रेम करीत.

गंगेचं वर्णन करताना त्यांच्यात कवी संचारत असे. मनात भावनांचा कल्लोळ दाटे. ही गंगा कधी त्यांना मातेसमान वत्सल तर कधी प्रेयसीसारखी सुंदर भासे. कधी त्यांना गंगेत भारत देश दिसायचा तर कधी अनंताचं रूप दिसायचं.

गंगेचं जे वर्णन जवाहरलालांनी केलं आहे ते विसरणं शक्य नाही. नेहमीच लक्षात राहील असंच ते आहे. गंगेबद्दल त्यांनी लिहिलं आहे : "तिच्यामुळे मला हिमालयातील बर्फाच्छादित शिखरं आणि खोल दऱ्या आठवतात. माझं आयुष्य जिथं गेलं आहे ती मैदानं आणि हिरवीगार शेतंही आठवतात. पहाटेच्या लालटपणात ती डोलात नाचत, हसत निघते. संध्याकाळच्या सावल्या पसरल्या की ती निस्तब्ध, उदास भासू लागते. हिवाळ्यात लाजाळू सडपातळ अशा अवस्थेत तिचं रूप दिसतं. पावसाळ्यात ती थैमान घालते, गर्जना करते समुद्रासारखाच तिचा ऊर विस्तारतो आणि समुद्रासारखीच विनाशाची शक्तीही तिच्यात संचारते."

लेकीला लिहिलेल्या एका पत्रातही त्यांनी गंगेचं वर्णन केलं आहे. आर्य

आईच्या निधनानंतर संगम स्नान करीत असताना नेहरू, 1937

लोक गंगेकिनारी पोहोचले असतानाची ही आठवण आहे. कित्येक हजार वर्षांपूर्वीची ही घटना. आर्यांना खाणंपिणं, हसणं, खेळणं, गाणं ह्याची अत्यंत आवड होती. त्यांना सौंदर्याचा आस्वाद घ्यायला आवडत असे. जवाहरलालांनी कन्येला लिहिलं आहे, "तू लक्षात घे, आपले पूर्वज, गंगेच्या दर्शनाने केवढे आनंदित होत असतील ?"

भारताचा भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ हे गंगेमुळे एकदम त्यांच्यासमोर येत असत. याहीमुळे गंगेवर त्यांचा जीव होता. ते लिहितात, "गंगा ही माझ्या लेखी भारताचा इतिहास आहे. जुन्या काळची आठवण. तो इतिहास आणि त्याच्या आठवणी वाहून नेऊन ती वर्तमानातल्या आमच्याशी ते जोडून टाकते. मग सारं एकत्र करून आगामी काळात गुंफून टाकते.

कन्येला लिहिलेल्या आणखी एका पत्रात त्यांना गंगा ही पर्वत प्रदेशातील तरूणीसारखी वाटल्याचं लिहिलं आहे. पर्वताची यात्रा करायची इच्छा प्रकट करणाऱ्या एका लेखात त्यांनी म्हटलं आहे, "नखरेल युवती गंगेच्या पर्वतातील घरी मी कधी जाऊन बसू शकेन का ? गर्व आणि अभिमानाने मान उंचावून हिमजलाचा शिडकावा करतानाचं तिचं दर्शन मला होऊ शकेल का ? प्रेमाने एखाद्या शिलाखंडाला आलिंगन देतांना ती मला कधी दिसेल का ? आणि तिथून मग हसतखेळत पत्थरांवरून उड्या घेत एखाद्या दरीत ती झेपावताना मी पाहू शकेन का ? थंड स्वभावाच्या शांत दिसत असणाऱ्या एखाद्या स्त्रीसारखी ती आजवर मला दिसली आहे. पण तिच्यात आग आहे. तारुण्यातली धग आणि जोखीम अंगावर घेण्याचं साहस आहे. तिच्या शांत वाटणाऱ्या लाटा जेव्हा कोपाने इकडेतिकडे उचंबळत असतात तेव्हाच तिचं हे रूप जाणवतं."

जवाहरलालजींच्या मनात तिची जागा धार्मिक पध्दतीने निर्माण झालेली नव्हती पण भारतातील कोट्यावधी लोक तर तिची पूजा करतात. तिचं जल अंगावर शिंपडून स्वतःला पवित्र करून घेतात. तिच्या काठी मृत्यू आला तर सरळ स्वर्गाला जाऊन पोहोचता येतं असं मानतात. माघ महिन्यातील मेळा, कुंभमेळा, अर्धकुंभ पर्वांच्या वेळी हजारो लोक अलाहाबादला येतात. संगमावर स्नान करायला जातात आणि 'गंगा माई की जय' असं म्हणतात.

जवाहरलालांनी हे कितीदा तरी पाहिलं. पण त्यांना ह्याची चीड आली नाही. ह्याला त्यांनी अंधविश्वास म्हणून अव्हेरलं नाही. त्यांना ह्यात भारतीय साध्याभोळ्या जनतेचा भाबडा भाव दिसला. त्यांनी त्यामुळेच आदरपूर्वक ते मनात जपून ठेवलं.

मेळ्याला येणाऱ्या यात्रेकरूंच्या मनात जो विश्वास दाटलेला असायचा त्यातली ताकद जवाहरलालांच्या मनावर प्रभाव पाडीत होती. यात्रेकरूंपासून हा विश्वास हिरावून घेणं त्यांना योग्य वाटलं नाही. त्यांना पाहून जवाहरलालांच्या लक्षात येई की जुन्या संस्कारांशी आपलं नातं कशा तऱ्हेने ठेवायला हवं. ह्या गोष्टीचा त्यांनी खूप विचार केला.

भारताला रूढींच्या जुन्या श्रृंखलांमधून मुक्त करायला हवं अशा निष्कर्षावर ते पोहोचले कारण ह्या श्रृंखला भारतवासीयांना जखडून ठेवतात, पुढे जाण्यापासून परावृत्त करतात आणि आपापसांत फूट पाडतात, असे त्यांचे मत होते.

ह्याचा अर्थ असा मात्र नव्हे की जुन्या सर्वच गोष्टींशी एकदम नातं तोडून टाकावं. अभिमान करण्याजोगा इतिहास त्यांना खूप आवडायचा. तो ते जपून ठेवू पहायचे. जाणाऱ्या आणि येऊ घातलेल्या काळाला एकत्रित बांधणारी अशी त्यांना गंगा वाटायची. स्वतःला ते काळाच्या श्रृंखलेतील एक भाग समजत असत. म्हणून त्यांना गंगेशी एकरूप व्हावसं वाटे.

गंगा त्यांना भारताच्या प्रदीर्घ इतिहासाचं प्रतीक वाटायची. भारतीय कला, कथा, पुराण व इतिहास त्यांना गंगेच्या लाटांमध्ये दिसायचा.

गंगास्नानावर इंग्रज सरकारने आणलेली बंदी त्यांना मान्य नव्हती. ह्याविरुद्ध झगडा दिल्याचा एक प्रसंग त्यांच्या आयुष्यात आहे. 1924 साली गेल्याप्रसंगी शासनाने त्रिवेणीवर स्नान करायला बंदी घातली. पंडित मदनमोहन मालवीय ह्यांना धार्मिक भावनेवरील ही बंदी आवडली नाही. त्यांनी धरणं धरलं. शासनाची आज्ञा भंग करायचा निश्चय केला.

त्रिवेणीवरील स्नानाचा जवाहरलालाचा हट्ट धार्मिक भावनेतून नव्हता. शासनाचे अयोग्य दडपण त्यांना सहन होणारे नव्हते म्हणून ते मालवीयजींबरोबर धरणं धरायला बसले. एवढंच फक्त नव्हे तर त्यांनी

पोलिसांचं कडं तोडून नदीत स्नानासाठी उडीही घेतली. स्नान करून पुन्हा धरणं धरलं. त्यानंतर मालवीयजींनी स्नानासाठी उडी घेतली. त्यांच्यासोबत जवाहरलालांनी पुन्हा उडी घेतली.

अशा तऱ्हेने जवाहरलालजींच्या मनात गंगेबद्दलच्या इतरांच्या भावनांबद्दल आदरही होता. तो जपण्यासाठी ते आवश्यक तेव्हा संघर्षालाही तोंड देत.

11

चाचा नेहरू

चाचा म्हणजे काका कुणाला म्हणायचं ? आपण सगळेच जण वडिलांच्या धाकट्या भावाला काका म्हणतो. आपल्या सभोवताली आणखीही एक काका असतो. गावात, गल्लीत जो माणूस मुलांना आवडतो, त्यालाही मुलं काकाच म्हणतात. खूप कामाचा असतो असा माणूस. आपल्याला जे समजलेलं नसेल ते समजावून सांगतो. अडचणींतून मार्ग काढून देतो. आपल्याला त्याच्यावर विसंबून राहाता येतं.

अशा माणसाचा मुलांवर खूप प्रभाव असतो. मुलंच नव्हे तर मोठी माणसंही त्याचं म्हणणं मान्य करतात. कारण त्याला बरंच काही समजत असतं आणि तो ते इतरांना समजावून देऊ शकतो. शाळेतल्या शिक्षकाहून हा कोठेही कमी नसतो. पण शिक्षक केवळ पुस्तक तेवढं शिकवतात. म्हणजे पुस्तकात लिहिलेलंच फक्त समजावून सांगतात. पण हा काका मात्र आयुष्यात उपयोगी पडू शकणाऱ्या अनेक गोष्टी सांगतो आणि समजावून देतो.

काही लोक कुटुंबातले काका असतात, तर काही असे गल्लीचे किंवा पेठेचे. काही जण मात्र गावाचेच काका असतात. पण काहींना मात्र संपूर्ण देश काका मानीत असतं. जो जेवढ्या जास्तीत जास्त माणसांचा विश्वास संपादन करू शकेल तेवढ्या सगळ्यांचा तो काका होतो. सारे जण त्याचा सल्ला घेतात, त्याचं म्हणणं मान्य करतात.

जवाहरलालही असेच काका होते. केवळ मुलांचेच नव्हे तर संपूर्ण देशभराचे. देशवासीयांना त्यांच्याकडून जे काही शिकायला मिळालं ते

दुसऱ्या कुणाहीकडून मिळणार नाही. त्यांच्याहून वरचे कोण तर महात्मा गांधीच फक्त. सारा देश त्यांना बापू म्हणत असे. ते आपले राष्ट्रपिता आहेत.

जवाहरलाल आणि गांधीजींचे विचार जरी एकसारखे नसले तरी इतरांवर त्यांचा पडणारा प्रभाव मात्र सारखाच होता. कशामुळे? ह्याचं उत्तर मात्र सोपं नव्हे. फक्त एवढंच सांगता येईल की त्यांच्या बोलण्याचालण्यात आणि इतरांशी मिसळण्याच्या पध्दतीत एक विशिष्ट गुण होता. हा गुण केवळ शिक्षकातच असू शकतो, गुरुतच असू शकतो. त्यामुळे लोक त्यांच्यावर विश्वास टाकतात. त्यांच्या म्हणण्याला एकदम कुणीच अव्हेरलं नाही. त्यांच्याशी सहमत नसलेला माणूसही त्यांचे म्हणणे समजून घ्यायचा प्रयत्न करायचा

मुलांसमवेत चाचा नेहरू

त्यांचं भाषण ऐकणाऱ्यांना तर त्यांच्यातला हा गुण विशेषच जाणवत असे. व्यासपीठावरून ते आरडाओरडा करीत नसत. वेडेवाकडे हातवारे करीत बोलून श्रोत्यांची दिशाभूल करीत नसत. मोठमोठ्या शब्दांचं अवडंबरही माजवीत नसत. ऐकणाऱ्या प्रत्येकाला जणू ते आपल्याशी गप्पा मारीत असल्यासारखंच वाटायचं. आकाशापासून पाताळापर्यंतच सारं काही सहजपणे समजावून सांगत. जगातल्या किती नानाविध गोष्टींची ते श्रोत्यांना ओळख पटवीत असत.

जवाहरलाल नेहमी म्हणत : "लोक काय विचार करतील अशी मला चिंता नाही. मला चिंता आहे ती लोक विचार तरी करतात की नाही ह्याची." लोकांनी जे काही करायचं ते समजून उमजून करावं असं त्यांना नेहमी वाटायचं. अगदी स्वतः बद्दलचा आदरही लोकांनी विचारपूर्वक योग्य वाटेल त्या प्रमाणातच करावा, अशी त्यांची इच्छा असे.

जवाहरलाल कॉंग्रेसचे अध्यक्ष झाल्यावर सारीकडे त्यांचा जयजयकार सुरू झाला. त्यांना पाहिलं की लोक 'राष्ट्रपती की जय' अशा घोषणा देत. आपल्याबद्दल लोकांच्या मनात असलेला आदराचा भाव भक्तीशी जाऊन भिडला आहे हे लक्षात आल्यावर ते चमकले. ह्या भक्तीभावनेमुळे लोक विचार करणं सोडून देतील अशी भीती त्यांना वाटली. लोकांना ह्या भ्रमातून बाहेर काढण्यासाठी त्यांनी एक लेख लिहिला:

त्या लेखात त्यांनी लिहिलं : "जवाहरलाल भावी काळात खूप चांगलं काम करू शकतील. मात्र आज आपण त्यांना बिघडू देता कामा नये. अतिशय आदर-सत्कार पाहिल्यावर ते कदाचित बिघडतील. त्यांच्या अभिमानाला वाव देता कामा नये. आम्हाला देशात हुकुमशहा नको."

हा लेख त्यांनी स्वतःच्या नावाने मात्र लिहिला नाही. तसं तर केलं असतं तर त्यांना हवा तो परिणाम साधला गेला नसता. त्यांना लोकांची विचारशक्ती जागृत करायची होती. लोकांना अशा तऱ्हेने दचकवून विचार करायला भाग पाडायचं होतं. स्वतःच्या नावाने लिहिल्यावर असं होण्याऐवजी लोकांनी उलट त्यांना डोक्यावरच घेतलं असतं.

जवाहरलाल लोकांना गंभीर बाबी फारच सहज वाटतील अशा पध्दतीने

समजावून सांगत असत. आपल्याला शिकवलं जातं आहे, हे लोकांच्या लक्षात येता कामा नये, असा हा प्रयत्न असायचा.

देश स्वतंत्र झाला खरा, पण त्याचं विभाजनही झालं. ह्या फाळणीमुळे घर असणारी कित्येक माणसं बेघर झालीत. अशांसाठी पुन्हा घरांची सोय केली जात होती. ती होईपर्यंत शरणार्थींसाठी असणाऱ्या तंबूत त्यांची व्यवस्था करण्यात आली होती. त्यावेळी अमेरिकेतून आलेल्या एकाला हे काम जवळून बघायची इच्छा होती.

या कामासाठी योजिलेल्या माणसांकडे तो गेला. त्यांना प्रश्न पडला की ह्या परदेशी माणसाला शरणार्थी शिबिरं दाखवावीत की नाही. याने जर आपल्या देशाचं नुकसान करणारा एखादा पेच जर ह्यातून निर्माण केला तर ? ह्या कार्यकर्त्यांमधलीच एका भगिनी हा प्रश्न सोडवायला जवाहरलालांकडे गेली. सहकाऱ्यांच्या मनातली भावनाही तिनं त्यांना बोलून दाखवली.

जवाहरलालांनी ह्या भगिनींना बसायला सांगितलं. नंतर ते तिला म्हणाले, "तुला ठाऊक आहे का तो कोण आहे ? तो अमेरिकेतून आला आहे. समाजात आज जो ताण पसरलेला दिसतो आहे त्याची कारणं तो शोधतो आहे. आपल्याकडेही त्याला हेच शोधायचं आहे. आपल्याविरुध्द लिहिलही तो कदाचित. कदाचित आपल्या उणीवा सगळ्यांसमोर आणील. कदाचित असंही होईल की जे आपण पाहू शकत नाही ते त्याला दिसेल. जास्त असो की कमी पण आपल्याला त्याच्याकडून निश्चितच काहीतरी शिकायला मिळेल. त्याच्या कामातून जगाच्या कल्याणात काही तरी शिकायला मिळेल. त्याच्या कामातून जगाच्या कल्याणात काही तरी मदत मिळू शकेल. आपण त्याला अडविता कामा नये."

जवाहरलालांनी विचार स्वातंत्र्यावर भाषण ठोकलं नव्हतं किंवा शोध करण्यासाठी स्वातंत्र्य किती आवश्यक असतं ह्यावरही वाद घातला नव्हता पण त्या भगिनींच्या लक्षात आपोआपच हे सारं आलं. जवाहरलाल आपल्या सहकाऱ्यांना जीवनाचं अगदी सरळ दर्शन घडवित असत. त्यासाठी अशाच प्रकारे त्यांना मार्ग शोधायला मदत करीत असत. प्रत्येकाला वाटायचं मात्र असं की जणू त्याने स्वतःनेच आपला मार्ग शोधून काढला आहे.

परदेश दौऱ्यावर जाऊन आल्यावर ते स्वतः बघितलेलं सगळं इतरांना सांगत असत. संसदेत पक्षाच्या लोकांची बैठक बोलावून त्यांना सारं काही सांगत. मुख्यमंत्र्यांना त्याविषयी पत्र लिहीत. पत्रकारांना मोकळेपणाने सांगत. सारं काही छापलं जाऊन देशवासीयांपर्यंत पोहोचत असे. देशभरात मग सार्वजनिक सभा होत. त्याठिकाणी स्वतः जाऊन जवाहरलाल मग लोकांना समजावून सांगत. अशा तऱ्हेने कितीही गंभीर असलेली आणि कितीही वरची असलेली प्रत्येक बाब ते सर्वसामान्यांपर्यंत भिडवत असत.

जवाहरलालांनी तीन मोठे ग्रंथ लिहिले. ते तुरुंगात असतानाच ते लिहिले गेले. तुरुंगातही त्यांना आपले म्हणणे इतरांना समजावून सांगायचीच काळजी असे.

साऱ्या जगाचे चाचा नेहरू

लोकांनाही जवाहरलालांना जाणून घ्यायची उत्सुकता लागलेली असे. त्यांनी स्वत:बद्दलची माहिती सांगणारं 'आत्मकथा' हे पुस्तक लिहिलं. तुम्ही ते वाचत असताना लक्षात येईल की ही केवल त्यांची स्वत:बद्दलचीच फक्त कथा नाही. ही आहे भारतीय स्वातंत्र्य संग्रामाची कथा. ह्याचप्रमाणे 'शोध भारताचा' हे पुस्तक भारताच्या गतजीवनाची माहिती सांगणारं आहे. आपला इतिहास चांगल्या पध्दतीने समजावून सांगणारं हे पुस्तक आहे. त्यातून भावी काळाकडे घेऊन जाणारी वाट आपल्याला दिसते.

पुढची वाट धुंडाळण्यासाठी जवाहरलालांना भूतकाळ माहीत करून घेणं खूप गरजेचं वाटत असे. ह्याच प्रमाणे अखिल विश्व एकच असल्याचीही भावना त्यांच्या मनात असायची. म्हणूनच त्यांना वाटायचं की आपल्या देशबांधवांना केवळ स्वत:च्याच नव्हे तर संपूर्ण जगाच्या इतिहासाची माहिती देणं आवश्यक आहे. कन्येला लिहिलेल्या पत्रांमध्ये त्यांनी जगातील सर्व देश, जाती आणि राष्ट्रांच्या कथांचं वर्णन केलं. त्याचं जे पुस्तक झालं ते 'जगाचा इतिहास' या नावाने प्रसिध्द आहे.

त्यांच्या पुस्तकांचा उपयोग सारेच जण करून घेतात. ते एक यशस्वी शिक्षकच म्हणायचे. आपल्या कन्येसाठीच केवळ नव्हे आणि भारतवासीयांसाठीच केवळ नव्हे तर संपूर्ण विश्वभरासाठी ते खात्रीने चांगले शिक्षक होते. त्यांचे विचार लोक आदराने वाचतात. त्यांवर विश्वास ठेवतात. साऱ्या जगाचेच ते काका ठरले आहेत.

Printed at Tarang Printers, F-40, Site "C", Surajpur Industrial Area, Greater Noida (U.P.)